आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in




दैनिक
# लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक १२४ वा ● बुधवार दि. ०९ ऑक्टोबर २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●

## अयोध्या येथे उभारण्यात येणाऱ्या महाराष्ट्र भक्त सदनाचे भूमिपूजन

मुंबई : अयोध्येत राम जन्मभूमी मंदिर परिसरात महाराष्ट्र भक्त सदन इमारत बांधणीचे भूमिपूजन मान्यवरांच्या हस्ते झाले. हे भक्त सदन उभारण्यासाठी राज्य शासनाने जूनमध्ये जमीन घेतली होती. या जागेवर पर्यावरणपूरक हरित इमारत (environmental friendly green building) बांधण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील जनतेसाठी हा आनंदाचा क्षण असल्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी सांगितले. ९५०० चौरस मीटर क्षेत्रफळावर १२ मजली भव्य भक्त निवास उभे राहणार असून त्या ठिकाणी ६५० पर्यटक राहू शकतील. भक्त निवासात एकूण ४ व्हीआयपी कक्ष, ९६ खोल्या असून ४० डॉर्मिटरी बांधण्यात येणार आहेत. पुढील तीन वर्षात हे बांधकाम पूर्ण करण्यात येणार आहे. हे भक्तनिवास अयोध्येतील महत्त्वाच्या सर्व स्थळांपासून जवळ आहे. महर्षी वाल्मिकी विमानतळापासून ११.५ किमी, श्रीराम जन्मभूमी मंदिर पासून ७.५ कि.मी. तर अयोध्या रेल्वे जंक्शनपासून ४.५ किमीवर आहे.

## विद्यार्थ्यांच्या आरोग्याची, सुरक्षिततेची पालकत्वाच्या भूमिकेतून काळजी घ्या - जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

लातूर : आई-वडील आपल्या मुलांना अत्यंत विश्र्वासाने शाळा, महाविद्यालये आणि वसतिगृहात पाठवितात. या विद्यार्थ्यांची काळजी घेणे ही प्रत्येक शाळा, महाविद्यालायचे प्राचार्य, वसतिगृहाचे अधीक्षक यांची जबाबदारी आहे. केवळ जबाबदारी म्हणूनच नव्हे पालकत्वाच्या भूमिकेतून त्यांनी विद्यार्थ्यांच्या आरोग्याची आणि सुरक्षिततेची काळजी घ्यावी. यामध्ये कोणत्या प्रकारची कुचराई खपवून घेतली जाणार नाही, असे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे सांगितले.






जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित प्राचार्य, वसतिगृह अधीक्षक यांच्या बैठकीत जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे बोलत होत्या. जिल्हा पोलीस अधीक्षक वर्षा ठाकूर-घुगे, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, समाज कल्याण सहायक आयुक्त शिवकांत चिकुर्ते, शिक्षणाधिकारी नागेश मापारी, तहसीलदार सौदागर तांदळे यावेळी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने सर्व शाळा, वसतिगृहामध्ये पिण्याच्या पाण्याची शुद्धता, वसतिगृहातील भोजनाची गुणवत्ता, शाळा आणि वसतिगृहात विद्यार्थी-विद्यार्थिनींची सुरक्षितता याकडे विशेष लक्ष दिले जावे. यासाठी राज्य शासनाने वेळोवेळी मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या असून त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे करणे सर्व शाळा, महाविद्यालये आणि वसतिगृहचालकांना बंधनकारक आहे. विशेषतः मुलींच्या सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे, महिला सुरक्षारक्षक यांची नेमणूक करावी. स्वच्छतागृहांची स्वच्छता आणि सुरक्षितता राखणे आवश्यक आहे. प्राचार्य, वसतिगृह अधीक्षक, गृहपाल यांनी स्वतः विद्यार्थ्यांशी सुसंवाद ठेवून त्यांना येणाऱ्या अडचणी, समस्या जाणून घ्याव्यात. त्याचे तातडीने निराकरण करावे. प्रत्येक शाळा, वसतिगृहात तक्रार पेटी लावण्यात यावी. या तक्रार पेटीत येणाऱ्या तक्रारींची योग्य दखल घेवून आवश्यक कार्यवाही करावी, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे म्हणाल्या.

शाळा, महाविद्यालयाच्या दर्शनी भागात महत्वाचे दूरध्वनी क्रमांक लावणे, पिण्याचे शुद्ध पाणी, वसतिगृहातील विद्यार्थ्यांची नियमित आरोग्य तपासणी, सीसीटीव्ही, भोजनाची गुणवत्ता, स्वच्छतागृहांची साफसफाई आणि सुरक्षितता, विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या बसेसची सुरक्षितता, तक्रार पेटी, सुरक्षा रक्षक नियुक्ती आणि शाळा, महाविद्यालये व वसतिगृहात नियुक्त कर्मचाऱ्यांची चारित्र्य पडताळणी आदी बाबींविषयी जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सूचना दिल्या. तसेच या सूचनांची आठ दिवसात अंमलबजावणी करून अहवाल सादर करावा. यापुढे शाळा, वसतिगृह यांची अचानकपणे तपासणी करून शासनाच्या मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी होत असल्याची खात्री करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी म्हणाल्या.

राज्य शासनाने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी शाळा, महाविद्यालये आणि वसतिगृहात करावयाच्या उपाययोजनांबाबत नियमावली जाहीर केली आहे. ही नियमावली सर्वांसाठी बंधनकारक असून यामध्ये कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा झाल्यास संबंधित संस्थेला जबाबदार धरण्यात येईल. तसेच प्रत्येक शाळांनी 'सिक्युरिटी ऑडिट' करून घ्यावे. जेणेकरून विद्यार्थ्यांच्या दृष्टीने संभाव्य धोक्यांवर वेळीच उपाययोजना करणे शक्य होईल. विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनांचे चालक, मदतनीस, शाळेतील, वसतिगृहातील कर्मचारी, भोजन व्यवस्था पाहणारे ठेकेदार व कर्मचारी यांची चारित्र्य पडताळणी करणे आवश्यक असल्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी सांगितले.

प्रारंभी उपजिल्हाधिकारी श्रीमती गाठाळ, शिक्षणाधिकारी श्री. मापारी, समाज कल्याण सहायक आयुक्त श्री. चिकुर्ते आणि तहसीलदार श्री. तांदळे यांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने उपस्थितांना मार्गदर्शन केले. जिल्ह्यातील महाविद्यालयांचे प्राचार्य, वसतिगृह अधीक्षक, गृहपाल यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठकीला प्रत्यक्ष व दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

## नुकसानग्रस्त शेतीचे तात्काळ पंचनामे करा - खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर

धाराशिव : गेल्या आठवडयात परतीच्या



पावसामुळे शेती पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. काढणीस आलेले सोयाबिन पिके बऱ्याच ठिकाणी पाण्याखाली जावून शेतकऱ्यांनी मोठया कष्टाने पिकवलेले पिक पाण्यामध्ये वाया जाण्याची परिस्थीती निर्माण झाली आहे. औसा तालुक्यातील किल्लारी येथे मोठया प्रमाणात परतीचा पाऊस झाल्याने शेतात पाणी साठून सोयाबीन पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. याचबरोबर लेट खरीप हंगामामध्ये कांद्याची शेतकऱ्यांनी मोठया प्रमाणावर लागवड केली आहे. सदर पावसामुळे कांदा पिक पाणी साठून वाया जाण्याच्या परिस्थीतीत असल्याने खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी थेट शेतकऱ्यांच्या शेतावर जावून पिकांची पहाणी केली.

त्यानंतर महसुल प्रशासनास नुकसानग्रस्त शेती पिकांचे पंचनामे तात्काळ करणेबाबत सुचना व नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी प्रशासनाने तात्काळ कारवाई करावी अशा सूचना करण्यात आल्या आहेत. यावेळी नुकसान झालेल्या भागाचे संबंधित तलाठी, कृषी सहाय्यक, ग्रामसेवक, विमा प्रतिनिधी यांनी समन्वय साधून पंचनामे करावेत. मदतीपासून वंचित राहिल्यास संबंधित अधिकारी जबाबदार राहतील असे लालनिर्देश दिले.तसेच संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## आलिबाग चित्रपट महोस्तवात प्रिय नदीस ठरला सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट

माजलगाव (प्रतिनिधी) भास्कर किसन शिंदे यांच्या 'भास्करनाना फिल्म प्रोडक्शन'



या निर्मिती संस्थेची पहिलीच निर्मिती असलेला प्रिय नदीस (Dear River)या लघुपटाने नुकत्याच पार पडलेल्या पाचव्या अलिबाग फिल्म फेस्टीवल-२०२४ मध्ये सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपटाचा बहुमान पटकावला आहे.

लेखक आर.प्रकाश(प्रकाश राठोड)यांनी या चित्रपटाचे लेखन केले असुन विष्णु उगले यांनी हा चित्रपट दिग्दर्शित केला आहे.तर अमर देवणे यांनी चित्रपटाचे दर्जेदार छायाचित्रण व कलात्मक संकलन केले आहे.चि.प्रसेनजीत शिंदे,बद्रीनाथ खंडागळे,ड.पूजा देडे व भिमराव घोडेराव या कलाकारांनी भूमिका केल्या आहेत. तसेच सौरभ धापसे व निकेश भांगे यांनी कला दिग्दर्शनाची बाजु सांभाळली तर ध्वनि मुद्रनाचे काम सुभाष कांबळे यांनी तर संतोषमामा चौरे, पृथ्वीराज शिंदे व टिल्लू दळवी यांनी निर्मिती प्रक्रियेत यांचे महत्त्वाचे योगदान दिले.प्रिय नदीस(Dear River)च्या या यशाबद्दल प्रिय नदीस (Dear River)च्या सर्व टिमचे मान्यवर व रसिक प्रेक्षक कलाप्रेमीच्या वतीने सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## मुंबईकरांचे स्वत:च्या घराचे स्वप्न म्हाडाच्या माध्यमातून साकार - गृहनिर्माण मंत्री अतुल सावे

मुंबई : 'स्वप्न पूर्ण करणारे शहर' म्हणून ओळख असलेल्या मुंबईत आपल्या हक्काचे घर असावे असे सर्वसामान्य नागरिकांचे स्वप्न असते. हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी राज्य शासन म्हाडाच्या माध्यमातून सर्वतोपरी प्रयत्न करीत असते. मुंबईकरांचे स्वतःच्या घराचे स्वप्न म्हाडाच्या माध्यमातून साकार होत असल्याचा मला आनंद आहे, असे प्रतिपादन गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी केले.



म्हाडाच्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे मुंबईतील विविध गृहनिर्माण योजनांतर्गत उभारण्यात आलेल्या २ हजार ३० सदनिकांच्या विक्रीसाठी संगणकीय सोडत आज यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे काढण्यात आली.

यावेळी मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, गृहनिर्माण विभागाच्या अपर मुख्य सचिव वल्सा नायर-सिंह, म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल, मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी मिलिंद बोरीकर, मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी मिलिंद शंभरकर आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी कार्यक्रमाची सुरुवात राज्यगीताने ४करून मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्ज्वलन करण्यात आले. मंत्री श्री.सावे म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे प्रत्येकाला घर देण्याचे स्वप्न आहे. सर्वांसाठी घरे हे स्वप्न साकार होण्यासाठी 'प्रधानमंत्री आवास योजना', 'मोदी घरकुल आवास योजना' सुरू केल्या आहेत. या माध्यमातून अल्प, मध्यम उत्पन्न गटातील सर्वसामान्यांना घरे वाटप करण्यात येत आहेत. राज्यात साडे सात लाख घरे बांधण्यात आली असून यातली अडीच लाख घर ही मुंबईमध्ये बांधली गेली आहेत. आजच्या या लॉटरीसाठी दोन हजार ३० घरांसाठी १ लाख १३ हजार पेक्षा जास्त अर्ज आले होते. आजची ही सोडत मानवी हस्तक्षेपविरहित संपूर्णत: ऑनलाईन अशा संगणकीय प्रणालीद्वारे प्रक्रिया राबविण्यात आली आहे. नाशिक, पुणे, कोकण, छत्रपती संभाजीनगर, नागपूर या शहरात पारदर्शकपणे लॉटरी प्रक्रियेमार्फत लोकांना घरे मिळाली आहेत. मुंबई शहर आणि परिसराचा झपाट्याने विकास होत आहे. त्यामुळे घरांची मागणी ही वाढत आहे. मुंबईत ही दुसरी सोडत असून लवकरच आणखी घरांची सोडत होईल. अभ्युदय नगर, कामाठीपुरा, शहरातील जुन्या वस्त्या येथील पुनर्विकासाचा प्रश्न मार्गी लागत आहे. राज्याचे नवीन गृहनिर्माण धोरण लवकरच आणले जाणार असून गृहनिर्माण धोरणामध्ये परवडणाऱ्या व टिकाऊ घरांवर भर दिला जाणार असल्याचे मंत्री श्री. सावे यांनी यावेळी सांगितले.

म्हाडामुळे मुंबईतील सर्वसामान्यांना घराचा दिलासा - पालकमंत्री दीपक केसरकर

म्हाडाच्या या लॉटरीमुळे मुंबईत सर्वसामान्य नागरिकांना घर मिळणार आहे. म्हाडाने मुंबईतील सर्वसामान्य जनतेला दिलासा देण्याचे काम केले असल्याचे मुंबई शहराचे पालकमंत्री दीपक केसरकर यांनी सांगितले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली मुंबईचा सर्वांगीण विकास करण्यात येत आहे. धारावी, बीडीडीचाळ यांच्या पुनर्विकासामुळे या भागातील नागरिकांच्या हक्काच्या घरांचे स्वप्न पूर्ण होणार आहेत. सर्वसामान्यांचे घरांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी 'प्रधानमंत्री आवास योजने'च्या माध्यमातून ही विकास करण्यात येत आहे. तसेच मुंबईच्या विकासासाठी लवकरच क्लस्टरची योजना सुरू करण्यात येणार आहे. या माध्यमातून मुंबईत लक्षावधी घरे उपलब्ध होतील असेही यावेळी मंत्री श्री. केसरकर यांनी सांगितले.

अपर मुख्य सचिव वल्सा नायर सिंह म्हणाल्या की, आजची लॉटरी प्रणाली ही पूर्णपणे मानवी हस्तक्षेपविरहित आहे. ही लॉटरी प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शकपणे झालेली आहे. म्हाडा म्हणजे विश्र्वास. म्हाडाचे घर मिळण्यासाठी मोठ्या संख्येने लोकांनी सहभाग घेतला यावरूनच लोकांचा म्हाडावर किती विश्र्वास आहे हे लक्षात येते. एक स्थिर आणि सुरक्षित घर सर्वांचं स्वप्न आहे. या लॉटरी प्रक्रियेने ते स्वप्न पूर्ण होत आहे.

प्रास्ताविकात श्री. जयस्वाल म्हणाले, २ हजार ३० सदनिकांच्या विक्रीकरिता सोडत करण्यात आली आहे. यासाठी अनामत रकमेसह १ लाख १३ हजार ८११ अर्ज पात्र होते. गेल्या वर्षभरात मुंबईमध्ये दुसऱ्यांदा लॉटरी प्रक्रिया राबविण्यात आली आहे. लोकांच्या मागणीनुसार सदनिकांचे दरही कमी करण्यात आले आहेत.

सोडतीत सहभाग घेतलेल्या अर्जदारांची संख्या लक्षात घेता मंडळातर्फे व्यापक नियोजन करण्यात आले होते. तसेच अर्जदारांना सोयीस्कररीत्या निकाल पाहता यावा याकरिता सभागृहाच्या आवारात व सभागृहात एलईडी स्क्रीन लावण्यात आले होते. या प्रकल्पात मुंबईतील गोरेगाव, मालाड, जुहू, दादर, वरळी, ताडदेव, वडाळा, कन्नमवारनगर, पवई यासह अन्य काही ठिकाणच्या एकूण दोन हजार ३० घरांसाठी ९ ऑगस्ट ते १९ सप्टेंबर दरम्यान अर्ज विक्रीची प्रक्रिया राबविण्यात आली होती.

जयश्री कोटकर आणि कृपाल पटेल या विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते अभिनंदन पत्र यावेळी देण्यात आले. कार्यक्रमाचे आभार मिलिंद बोरीकर यांनी यावेळी मानले.

## नरेंद्र मोदींच्या विकासाच्या कार्यक्रमाला हरियाणाच्या जनतेने साथ दिली

मुंबई : हरियाणाच्या जनतेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्र्वास दाखवत खोटा प्रचार करणाऱ्यांना नाकारले आहे. हरियाणात जे घडलं तेच नोव्हेंबर मध्ये महाराष्ट्रात घडणार आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी केले. हरियाणातील विजयाबद्दल भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या विजयोत्सवात श्री. फडणवीस बोलत होते. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, खा. डॉ. भागवत कराड, ज्येष्ठ नेते भाई गिरकर, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, मुंबई भाजप सरचिटणीस संजय उपाध्याय आदी या प्रसंगी उपस्थित होते. जम्मू काश्मीरमध्ये कोणता पक्ष जिंकला हे महत्वाचे नसून तेथील निवडणुकीमुळे जम्मू - काश्मीरबद्दल आंतरराष्ट्रीय पातळीवर खोटा प्रचार करणाऱ्या पाकिस्तानला जोरदार चपराक बसली आहे, असेही श्री. फडणवीस यांनी नमूद केले. श्री. फडणवीस म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत विरोधकांनी केलेल्या खोट्या प्रचाराचा भारतीय जनता पार्टीला फटका बसला. अशा खोट्या प्रचाराला तशाच पद्धतीने उत्तर देण्याचा निर्णय पक्षाने घेतला होता. लोकसभा निवडणुकीनंतर पहिली परीक्षा हरियाणा, जम्मू - काश्मीर मध्ये होती. या परीक्षेत मतदारांनी विरोधकांच्या खोट्या प्रचाराला स्पष्टपणे नाकारून नरेंद्र मोदी यांच्या विकासाच्या कार्यक्रमाला साथ दिली आहे. हरियाणामध्ये अग्नीवीर योजनेविरोधात अपप्रचार झाला. खेळाडूंना पुढे करून रान पेटविण्यात आले. वेगवेगळया समाज घटकांत फूट पाडण्याचे कारस्थान रचले गेले. मतदारांनी हा खोटा प्रचार नाकारत मागील निवडणुकीपेक्षा भारतीय जनता पार्टीला मोठे यश मिळवून दिले. विरोधी पक्षनेते झालेल्या राहुल गांधींना हरियाणाच्या जनतेने पहिली सलामी दिली असून दुसरी सलामी महाराष्ट्रात मिळेल, असेही श्री. फडणवीस म्हणाले. जम्मू काश्मीर मध्ये भारताचा, लोकशाहीचा विजय झाला आहे, असे स्पष्ट करत श्री. फडणवीस म्हणाले की, ३७० वे कलम रद्द झाल्यानंतर तेथे रक्ताचे पाट वाहतील असे म्हणणाऱ्यांना तेथील जनतेने उत्तर दिले आहे. काश्मीरच्या जनतेवर भारतात अन्याय होतो आहे, असा प्रचार आंतरराष्ट्रीय पातळीवर करणाऱ्या पाकिस्तानला काश्मीरच्या जनतेने चपराक लगावली आहे. यावेळी प्रदेशाध्यक्ष श्री. बावनकुळे म्हणाले की, महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली हरियाणा सारखाच विजय मिळविण्याचा निर्धार केला पाहिजे.




**.... " त्यांना विचारतो ?, आता कसं वाटतय**

हरियाणात काँग्रेस विजयी होणार या खात्रीने महाराष्ट्रातील महविकास आघाडीच्या नेत्यांनी आज काय बोलायचे याची तयारी करून ठेवली होती. या नेत्यांना, सकाळी नऊ वाजताच्या भोंग्याला आता मला विचारायचं आहे की, आता कसं वाटतंय? असा टोला श्री. फडणवीस यांनी लगावला.

## 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजना' पुढील पाच वर्ष चालू राहील - उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

सोलापूर, (जिमाका) :- राज्य शासनाने महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी मुख्यमंत्री -माझी लाडकी बहीण योजना सुरू केलेली आहे. राज्यातील २ कोटी २० लाख बहिणींच्या खात्यात थेट पैसे जमा झालेले आहेत. महिलांच्या सक्षमीकरणाचा विचार प्रथम या शासनाने केलेला असून त्याचा लाभ राज्यातील लाडक्या बहिणींना मिळत असल्याने त्यांना एक प्रकारचा आनंद व समाधान मिळत आहे. हा आनंद व समाधान टिकून राहण्यासाठी शासन ही योजना कोणत्याही अडचणींशिवाय पुढील पाच वर्ष चालू ठेवणार असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजना' वचनपूर्ती सोहळा अंतर्गत होम मैदान येथे आयोजित जिल्हास्तरीय कार्यक्रमात उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस मार्गदर्शन करत होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, आमदार सर्वश्री विजयकुमार देशमुख, सुभाष देशमुख, राजेंद्र राऊत, समाधान आवताडे, सचिन कल्याणशेट्टी, संजय शिंदे, शहाजी बापू पाटील, राम सातपुते, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, सोलापूर महापालिका आयुक्त शितल उगले तेली, सोलापूर शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार, जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, मुख्यमंत्री जनकल्याण कक्षाचे डॉ. अमोल शिंदे, ज्योती वाघमारे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस पुढे म्हणाले की, या योजनेअंतर्गत लाडक्या बहिणींना जून जुलैचे प्रतिमाह पंधराशे रुपये प्रमाणे पैसे थेट त्यांच्या बँक खात्यावर जमा झालेले आहेत. भाऊबीज नोव्हेंबर महिन्यात येत असल्याने राज्य शासनाने विचार करून याच महिन्यात भाऊबीज म्हणून थेट नोव्हेंबर महिन्याचे पैसेही बहिणींच्या बँक खात्यात जमा केलेले आहेत.




आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

# झरोका

एक – धनगर समाजाला आदिवासीचे प्रमाण पत्र देण्यासाठी शासन निर्णय जाहिर केला. पण धनगराचे काय असा प्रश्न लोक चर्चिला जातो आहे. त्यातले गुपीत काय आहे. हे कळत नाही. माझ डोकं बधीर झालं आहे.

दुसरा – अरे, नेहमीसाठी सारखं, सरखं डोकं बधीर झालं म्हणतोस, परंतू धनगरांनी धनगडा बद्दल जे कांही घडते आहे, त्याचे काय, असे मला वाटते म्हणून बोलतो आहे.

एक – अहो, धनगर हि जात ओबीसी मध्ये येते. धनगड ही जात इतर मागासवर्गीया मध्ये मराठा आणि कुणबी ही जात एकत्र समजून ज्या पध्दतीने न्याय निवाडा केला जातो आहे, त्याच हिशोबाने शिंदे समितीच्या अहवालानुसार धनगर आणि धनगड ही जात समकक्ष ठरवून याना आरक्षण द्यावे अशी मागणी होताना दिसते आहे. ती शिंदे सरकारने का फेटाळावी अशीच आश्चर्यकारक प्रतिक्रिया सर्वसामान्यातून प्रकट होताना दिसते आहे.

दुसरा – अरे, तुझं डोकं ठिकाण्यावर आहे की नाही. हेच मला कळत नाही. कारण मराठा कुणबी आरक्षणाच्या संदर्भात गायकवाड समितीचा अहवाल केंद्र सरकारने फेटाळला सर्वोच्च न्यायालयाने बेदख्खल केला. परंतू मुख्यमंत्री शिंदे हे नको त्या प्रयासामधून आपली बाजू शाबूत ठेवू पाहात आहेत, मराठा आरक्षण किंवा धनगर, धनगड यांचा निर्णय लागू शकतच नाही, केवळ महाराष्ट्र विधानसभा निवडणूका डोळ्या समोर ठेवून शिंदे, फडणवीस, पवार हे तगमग करीत आहेत. त्यातून त्यांना चगळ ही मिळणार नाही,अशी लोकभावना व्यक्त होताना दिसते आहे.

एक – अरे, काय बोलतोस तू, सत्ताकारणा समोर गाढवाना ही नासलेले कांदे पाची पक्कवानं समजून तूम्ही चाकतच राहा, आणि उद्याचा दिवस कसा उगवेल हे अवदसाला किंवा केरसुनीला विचारा एवढेच !

# काय बोलता राव ?

आधी मताचे गाळप करा, आणि पुन्हा ऊसाचे गाळप करा, बांबू, बंम्बू कोणाच्या काय फायद्याचा हे आम्हाला देणे, घेणे नाही, पंरतू लातूर जिल्ह्यातील एकमेव अशा उदगरी, जळकोट, राखीव विधानसभा मतदार संघा मध्ये विद्येमान मंत्री संजय बनसोडे चलती असताना त्या ठिकाणी भाजपाचे माजी आमदार सुधाकर भालेराव आणि भाजपाचेच माजी खासदार सुधाकर शृंगारे हे पक्ष बदलून उदगीर राखीव मतदार संघात निवडणूक लढविण्याच्या तयारीत दिसत आहे.

**काय बोलता राव,**

अरे, मांतग समाजातील जेष्ठ नेते, माजी आमदार सुधाकर भालेराव हे दोन टर्म आमदार होते. राष्ट्रवादी कॉग्रेसच्या शरद पवार यानी जाती बेरजेचे राजकारण करुन राष्ट्रवादीच्या संजय बनसोडे यांना आमदार, राज्य मंत्री केले. पंरतू सत्ताबदलाच्या राजकारणातून राष्ट्रवादी मध्ये तोडफोड झाली, आणि संजय बनसोडे कॅबिनेट झाले असले तरी ही, आजच्या घडीला उदगीर, जळकोट राखीव मतदार संघातून कोण, कोणास पुरक ठरतो हे सांगणे कठीण असल्यामूळे भाजपा महायुती आणि महाविकास आघाडीतील उमेदवारीवरुन खरे काय ते कळणार आहे. परंतू महाराष्ट्राच्या राजकारणात केवळ संजय बनसोडे यांच्यामुळे उदगीरी, जळकोट मतदार संघ चर्चेत आहे, पुढचे काय ते बोला दाजीबा !

# अवदसाच्या पोटी केरसुनी ?

## संपादकीय...

गेली दहा पंधरा वर्ष कॉग्रेस मुक्त भारत म्हणून प्रधान मंत्री नरेंद्र मोदी हे गाजावाजा करीत होते. त्यातच केंद्रीय गृह मंत्री अमित शहा हे, भ्रष्टाचार मुक्त भारताची वंल्गना करीत होते. कॉग्रेस किंवा विरोधी पक्षानी भाजपा मुक्त घोषणा केली नाही. परंतू प्रधान मंत्री नरेंद्र मोदी हे कॉग्रेस मुक्त भारतासाठी राण पेटवीत होते. दे दाण सुटे गिऱ्हाण म्हणून मैदान पिठवत होते. पंरतू जसतसे उर बडवीत राहीले, तसं तसे भारतातील विविध राज्यानी मोदीजीना सलाम केला, आणि आजघडीला मोदी, शहा कोठे आहेत, अवदसापोटी केरसुनी जन्मली अशीच लोकभावना व्यक्त होताना दिसते आहे.

भारतीय समाज कारण, राजकारण, सत्ताकारणा मध्ये राष्ट्रीय स्वंयसेवक संघाच्या माध्यमातून नरेंद्र मोदी आणि अमित शहा नावाचे अवकळ पोरं गुजरात मधून भारतीय राजकारणात आले, आणि स्वतः बरोबरच देशाचा सत्यानास करण्यासाठी ते कार्यरत असले तरी मोदी, शहा आणि भगवतांना कुठल्याही परिस्थिती मध्ये भारतीय सत्ताकारणात कोणीही जागा देवू शकत नाही. हे आजच्या नाममात्र जम्मू कश्मिर आणि हरियाना विधानसभा निवडणूकीच्या माध्यमातून समोर येते, ते ही नसे थोडके.

भारताचे पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांचे कौतूक करावे तेवढे कमीच आहे. कारण ज्या कांही योजना घोषणा केल्या त्या कार्यान्वीत झाल्याच नाहीत. परंतू एक अदृष्य शक्ती म्हणून विश्वगुरु बनून हिमालयाच्या पायथ्यावर बसू पाहाणाऱ्या नरेंद्र मोदी यांना जम्मू कश्मिरनेच नाकारले तर यासाठी ३७० कायदा मोदी, शहाच्या बापाचा आहे की, जम्मू कश्मिरच्या नागरीकांचा आहे, हे जर कोणाला कळत नसेल तर मोदी, शहा यांच्या शहानपनाचे धिंदवडे कोणत्या गाढवीच्या नांवावर काढावेत अशी लोकभावना व्यक्त होताना दिसते आहे. त्यामूळे हरियाना, जम्मू कश्मिरच्या निवडणूक निकाला नंतर मोदी, शहा पाय उतार होणार की, मी नाही त्यातली, कडी लावा आतली म्हणून सत्ताकारण करीत राहतील की काय, म्हणूनच अवदसाच्या पोटील केरसुनी कशी काय जन्मली, हा प्रश्न अनुत्तरीतच राहातो.

## हरियाणात 'हॅट्रिक', महाराष्ट्रात बळ! भाजप विजयाचा महायुतीला फायद्याची शक्यता-हेमंत पाटील

मुंबई : पक्ष तसेच सत्तेविरोधात असलेले वातावरण, मतदानोत्त चाचण्याचा भाजप विरोधातील कल आणि राजकीय विश्र्लेषकांची भाकिते खोटी ठरवत भाजपने हरियाणात सत्तेची 'हट्रिक' लगावली आहे. भाजपच्या या विजयामुळे महाराष्ट्रात महायुतीला बळ मिळेल, असा अंदाज इंडिया अगेन्स्ट करप्शनचे राष्ट्रीय अध्यक्ष हेमंत पाटील यांनी मंगळवारी (ता.८) वर्तवला.सत्तेविरोधातील लहर असतांना देखील भाजपने एकहाती सत्ता मिळवली आहे, हे विशेष असल्याचे पाटील म्हणाले.

हरियाणात कॉंग्रेसला पोषक वातावरण असताना देखील पक्षाला चांगली कामगिरी करता आलेली नाही.पक्षांतर्गत गटबाजी आणि अतिविश्र्वासाचा फटका पक्षाला बसला. लोकसभा निवडणुकीत कॉंग्रेसच्या 'नरेटिव्हचा' फायदा झाला होता. परंतु,विधानसभा निवडणुकीत फायदा दिसून आला नाही. हरियाणा विधानसभा विजयाचा महाराष्ट्रातील भाजप कार्यकर्त्यांना बळ मिळेल, हे सत्य नाकारता येत नाही. महिन्याभरावर येवून ठेपलेल्या विधानसभा निवडणुकीत पक्षाची कामगिरी सुधारण्यास यामुळे मदत होईल,असे पाटील पुढे बोलतांना म्हणाले.

हरियाणा विधानसभा निवडणुकीच्या निकालामुळे मात्र महाविकास आघाडीच्या चिंतेत भर पडली आहे. एक दशक भराहून सत्तेत असतांना आणि सत्तेविरोधात लहर असतांना देखील या राज्यात भाजपने एकहाती सत्ता काबीज केली आहे. केंद्रशासित जम्मु–कश्मीर मधील निवडणुकीत देखील जम्मु क्षेत्रात भाजपची कामगिरी समाधानकारक दिसून आली आहे. अशात महाराष्ट्रातील राजकीय व्युहरचनेत बदल करण्याची वेळ मविआवर आली आहे. राज्यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात भाजप निवडणुकीला समोर जाणार आहे. महायुतीचे घटक पक्ष शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्या सोबतच्या जागावाटपाचा फॉर्मुला जवळपास निश्र्चित झाला आहे. विजयादशमी नंतर केंद्रीय निवडणूक आयोग राज्याच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहिर करण्याची शक्यता आहे.

हरियाणातील या निकालाचा प्रभाव महाराष्ट्रातील निवडणूक तयारीला वेग देणारा आहे. भाजप आणि संघाचे पदाधिकारी, स्वयंसेवक घरोघरी जावून पक्ष प्रचाराला लागले आहेत. संघाची मदत भाजपला मिळत आहे. उलटपक्षी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरद पवार गटाने देखील तयारींना वेग दिला आहे. मविआचे अनेक मेळावे जिल्हानिहाय आणि क्षेत्रनिहाय घेतले जात आहे.सत्ताधार्यांविरोधात लहर थोपवता येवू शकते, याचे उत्तम उदाहरण हरियाणातील विजयाने भाजपने दाखवून दिले आहे. अशात त्याचा व्युहरचनेचा वापर राज्यात करण्याचा मानस भाजपचा असू शकतो, हे नाकारता येणार नाही, असे पाटील म्हणाले.

# बुध्द तत्वज्ञानाचं विचारधन : भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो

भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो याचा धम्म चळवळीतील योगदान काळच्या कसोटीला उतरले आहे. धम्माचे गाढे अभ्यासक विशुध्द आचारवंत प्रज्ञा शील करुणा चे मूर्तिमंत प्रतीक म्हणून त्यांच्याकडे आदराने बघितल्या जाते. त्यांच्या जीवनाचा आतापर्यंत प्रवास प्रेरणादायी, स्फूर्तीदायक व दिशादर्शक आहे. ५ जानेवारी १९७५ या दिवशी भंते ऊपाली यांनी कठोर शिस्तीचे अंधश्रध्दा, रुढी परंपरा यावर तुटुन पडणारे धम्म साध्या पध्दतीने समजावुन सांगणारे व अंतकरणामध्ये कमालीचे करुणा असणारे होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली व सरकार खाली भदंत उपगुप्त महाथेरो यांच्या विचारांची जडण घडण झाली. भदंत ऊपाली विविध ठिकाणी प्रवचनासाठी जात असत. सोबत भदंत उपगुप्त त्यांना घेवून जात असत. डिसेंबर १९७५ नागपूर या ठिकाणी बुध्द धम्माचे फार मोठे अधिवेशन भरले होते. बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर, रिपब्लीकन नेते बी.सी. कांबळे, जागतिक किर्तीचे विद्वान भंते भदंत डॉ. आनंद कौशल्यायन यांची अधिवेशनाला प्रमुख उपस्थिती होती. या ऐतीहासिक अधिवेशनाला भदंत उपाली थेरो भदंत उपगुप्त यांना घेवून गेले होते. भदंत आनंद कौशल्यायन यांच्या धम्मदेशनाचा दूरगामी परिणाम त्यांच्या मनावर झाला. भैय्यासाहेब आंबेडकर व इतर मान्यवरांचे विचार ऐकुन ते प्रभावित झाले. नंतरच्या काळामध्ये ज्या ज्या ठिकाणी भदंत डॉ. आनंद कौशल्यायन यांची प्रवचने ज्या ठिकाणी होत त्या ठिकाणी भदंत उपगुप्त जात असत. यामधुन त्यांचा जवळुन परिचय झाला. २१ जानेवारी १९८१ हा दिवस भते उपगुप्त त्यांच्या जिवनामध्ये सुवर्ण अक्षरांमध्ये लिहून ठेवण्यासारखा भदंत डॉ. आनंद कौशल्यायन यांच्या हस्ते त्यांच्या प्रबज्या विधी पार पाडला. हे ठिकाण उत्तरप्रदेशातील बुध्द धम्माचे पवित्र स्थळ कुशीनगर होय.

बोधीसत्व परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ज्यांनी धम्मदीक्षा दिली असे भदंत चंद्रमणी महास्थविर त्यांच्या वात्व्याने पावन झालेली ही भूमी या रोमहर्षक प्रसंगी भंते उपगुप्त यांचे पूर्वाश्रमीचे आई–वडील त्याचप्रमाणे पूर्णा शहरामध्ये धम्मसेवेला वाहून घेतलेले भास्कर भराडेबाई, टिकाबाई खरे, अंजनाबाई कांबळे, सुरवयी पालकर व इतर श्रध्दा संपन्न उपासक आणि उपासिका उपस्थित होते. प्रबोधन दृष्टिचे पुज्य भदंत ऊपाली व धम्माचे अभ्यासक महान साहित्यिक विशुध्द आचार व विचार ज्यात संपूर्ण जीवन बोधीसत्व परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धम्मक्रांतीला समर्पित होत असे. भदंत डॉ. आनंद कौशल्यायन यांच्या विचाराचा प्रभाव भंते उपगुप्त यांच्या मध्ये प्रतिबिंबित झाला. त्यांनी तेव्हाच स्पष्ट केले होते, की येणाऱ्या काळात माझा शिष्य उपगुप्त हे जागतिकींचे बौध्द भिक्खु होतील ते आज आपणाला खरे होतांना दिसत आहे. डॉ उपगुप्त महाथेरो खऱ्या अर्थाने धम्माचे चालते–बोलते विद्यापीठ आहे. त्यांनी बुध्दविहारामध्ये स्वत:ला बंदिस्त करुन ठेवले नाही. यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली बावरीनगर नांदेड, सात्कर्मी लातूर, धम्माचल अजिंठा, बीड, हिंगोली, देवगांव फाटा परभणी व इतर अनेक ठिकाणी भव्य–दिव्य बुध्दविहार व संस्कार केंद्र उभारली आहेत. पूर्णा शहरात बौध्दकालीन वास्तुशिल्प कलेचा विलोभनिय नमुना असलेलं बुध्द विहार निसर्गरम्य उद्यान, सुसज्ञ ग्रंथालय व वाचनालय स्पर्धा परिक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र अभ्यासिका तीन मजली पर्यटक निवास प्रशस्त जागे मध्ये उभे आहे.

महाराष्ट्र शासनाने या विहारास पर्यटन स्थळाचा व तीर्थक्षेत्राचा दर्जा दिला आहे. वर्षभर बुध्दविहारामध्ये धम्माच्या प्रबोधनाचे कार्यक्रम रविवारी साप्ताहिक वंदन पोर्णीमेला धम्मदेसना, वर्षावास कालखंडामध्ये धम्म ग्रंथाचे वाचन मान्यवर व व्याख्यान थोर महापुरुष व समाजसुधारक यांची जयंती दिन व स्मृतीदिन साजरे केले जातात. दरवर्षी नित्य नियमाने देश–विदेशात त्यांच्या मार्गदर्शनाखाली धम्म सहलीचे आयोजन केले जाते. भदंत डॉ. महाथेरो यांच्या मार्गदर्शनाखाली व सरकारातून उच्चशिक्षित चारित्र्य संपन्न भिक्खूची मोठी परंपरा तयार झाली आहे. भंते जिनरत्न, भंते प्रज्ञापल, भंते बोधीशिल, भंते बोधीधम्म, भंते पंय्यावांश, भंते पंय्याबोधी हे सर्व बौध्द भिक्खु बुध्दविहार पुर्णा येथुन घडले. धम्माचे अद्यावत ज्ञान प्राप्त व्हावे यासाठी त्यांनी काही भंतेना श्रीलंका या ठिकाणी पाठविण्यात आले. धम्माच्या प्रचार व प्रसार कार्यात त्यांचे योगदान अतिशय मोलाचे आहे. धम्म कार्य करणाऱ्या संघटनामध्ये सुसूत्रता असावी. त्यांच्या मध्ये योग्य तो समन्वय असावा. विशुध्द रुपा मध्ये धम्म समाजामध्ये रुजावा. यासाठी व भारतीय बौध्द महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष महाउपासिका मीराताई आंबेडकर कार्याध्यक्ष आदरणीय भीमरावजी आंबेडकर यांच्या सोबत मंगलमैत्रीची भूमीका घेवून अखिल भारतीय भिक्खु संघ व भारतीय बौध्द महासभा यांनी एकत्र येवून धम्माचा प्रचार व प्रसार करण्याचा संकल्प केला आहे. लातूर, परभणी, बीड व इतर ठिकाणी भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो व भारतीय बौध्द महासभेचे कार्याध्यक्ष आदरणीय भीमरावजी आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली धम्मपरिषद संपन्न झाल्या.

निश्र्चितच त्यांच्या प्रयत्नातून बोधिसत्व परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेला प्रबुध्द भारत निर्माण होणार आहे. जगामध्ये विविध बौध्द राष्ट्र आहेत. श्रीलंका, म्यानमार, कंबोडिया, भूटान, चीन, थायलंड, जापान, दक्षिण कोरिया येथील उपासक–उपासिका यांनी विशुध्द स्वरुपामध्ये बौध्द धम्म जतन करुन ठेवला आहे. शिल सदाचार नैतीक मार्गाने बुध्द तत्वज्ञानाचा स्वीकार करुन एक आदर्श बौध्द राष्ट्र म्हणुन नावलौकिकास पात्र आहेत. अशा राष्ट्रांच्या धम्म सहलीचे आयोजन त्यांच्या मार्गदर्शनाखाली होत असते. भारतीय प्रशासन सेवेतील उच्चपदस्थ सेवानिवृत्त अधिकारी यांचे शिष्टमंडळ भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो यांच्या मार्गदर्शनाखाली दक्षिण कोरिया या बौध्द राष्ट्राला भेट देवून आले. दक्षिण कोरियाच्या मदतीने अजंठा धम्माचल या ठिकाणी आंतरराष्ट्रीय दर्जाचे पाली भाषेचे विद्यापीठ, धम्माचे संशोधन केंद्र उभे करण्याचा त्यांचा मानस आहे. या ठिकाणी ७४ एकर जमीन खरेदी केलेली आहे. दरवर्षी या ठिकाणी धम्म परिषदेचे आयोजन केल्या जाते. दक्षिण कोरिया येथील भंतेगण, विद्यापीठाचे कुलगुरु व तेथील उद्योगपती यांनी उपस्थिती या धम्मपरिषदेला होती. जागतिक दर्जाचे पाली विद्यापीठ व धम्माचे संशोधन केंद्र सुरु करण्यासाठी सर्वतोपरी मदत करण्यास त्यांनी आश्र्वासित केले आहे.

लोक भाऊंच्या कालखंडामध्ये पूर्णा शहरामध्ये त्यांच्या मार्गदर्शनाखाली मोठया प्रमाणावर गरीब व गरजु लोकांना अन्नधान्याचे व जीवनावश्यक वस्तुंचे वाटप फिजीकल डिसटन्स चे अंतर ठेऊन करण्यात आले. या कालखंडामध्ये घरपोच ग्रंथ व पुस्तक वाचण्याचे सुविध उपलब्ध करुन दिली. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी त्यांचा वर्षावास सुरु आहे. हाती घेतलेले प्रत्येक रचनात्मक काम धम्मकार्य सातत्याने ते पार पाडत असतात. ५ मार्च २०२२ हा त्यांचा श्रामणेर पप्जजा विधीचा ४७ वा वर्धापन दिन महाराष्ट्राच्याच देशाच्या विविध भागातून शुभेच्छांचा वर्षाव त्यांच्यावर होत आहे. या मंगलप्रसंगी त्यांना आयु, आरोग्य व बळ प्राप्त होवो. त्यांनी हाती घेतलेले धम्म कार्य सदोदितपणे चालू राहो ही मनोकामना.

**प्रविण बागडे.नागपूर - १४**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

# लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण कायद्याचे काटेकोरपणे पालन होणे गरजेचे : ॲड. जयश्रीताई पाटील

लातूर : अठरा वर्षाखालील मुलांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण व्हावे याकरिता लागू करण्यात आलेल्या बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायदा : २०१२ या कायद्याचे काटेकोरपणे पालन होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र वूमेन्स लॉयर्स फेडरेशनच्या अध्यक्षा ॲड. जयश्रीताई पाटील यांनी केले आहे.



येथील शिवछत्रपती शिक्षण संस्थाद्वारा संचालित राजर्षी शाहू कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या पोक्सो ॲक्ट २०१२ च्या अनुषंगाने आयोजित करण्यात कार्यक्रमात त्या विद्यार्थी – विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना बोलत होत्या. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ॲड. जयश्रीताई पाटील यांच्यासह ॲड.सुजाता माने, ॲड.सरोज पवार, सीईटी सेलचे संचालक प्रा. डी.के. देशमुख यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम.एच. गव्हाणे हे होते. यावेळी बोलताना ॲड. जयश्रीताई पाटील यांनी पोक्सो कायद्याबद्दल अत्यंत सविस्तर आणि विद्यार्थ्यांना समजेल अशा भाषेत अत्यंत उपयुक्त माहिती दिली. लहान मुले ही आपल्या देशाचे भवितव्य असतात.आपल्या देशाचे भावी नागरिक म्हणून त्यांना संपूर्णतः संरक्षण देणे ही प्रत्येक जागरूक नागरिकांची जबाबदारी आहे. त्यांच्यावर कोणा जवळच्याकडूनच जर लैंगिक अत्याचार झाला तर ते ही बाब कोणालाही सांगू शकत नाहीत. मात्र त्यामुळे त्यांचे मनोबल खचते आणि त्याचा परिणाम त्यांच्या जीवनावर , भविष्यावर होऊ शकतो. लहान बालकांवर जर अशा प्रकारचा अन्याय – अत्याचार झाला तर पोक्सो कायदा २०१२ अंतर्गत त्यांच्यावर अन्याय करणाऱ्याला जबर शिक्षाही होऊ शकतो. हा कायदा पूर्णतः बालकांच्या संरक्षण व सुरक्षेच्या दृष्टीने तयार करण्यात आला आहे. आपल्यावर असा गंभीर प्रसंग आला तर लहान मुले पोलिसात जाऊन तक्रार करायला धजावत नाहीत. त्यांच्या मनात नाहक भीतीने घर केलेले असते. परंतु या कायद्याने बालकांना खऱ्या अर्थाने संरक्षक कवच उपलब्ध करून दिले आहे. लहान मुलांवर अशा अत्याचारात मागच्या काही वर्षात सातत्याने वाढ झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. असा प्रकार घडलेल्या बालकांना पोलिसांकडून विशेष सहकार्य करण्याची तरतूद आहे. पोलीस अशा मुलांना आपल्या गणवेशात विचारपूस करू शकत नाहीत तर त्यांना साध्या कपड्यात चौकशी करावी लागते. असा गुन्हा करणाऱ्या गुन्हेगारांना आता या कायद्यान्वये शिक्षेचीही तरतूद आहे. बालकांनी आपल्याबाबतीत असा प्रकार घडल्यास न घाबरता, निडरपणे आपल्या निकटवर्तीयांना, कुटुंबियांना त्याही माहिती द्यावी. त्यांना कायद्यान्वये सर्व संरक्षण पुरवले जाईल, असेही ॲड. जयश्रीताई पाटील यांनी सांगितले.

यावेळी ॲड.सुजाता माने, ॲड.सरोज पवार यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. शेवटी प्रा. सोमवंशी यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. संगीता तोडकर, प्रा. माया भांबरे, प्रा. वनिता ढोबळे पाटील यांनी सहकार्य केले.

# मानेमध्ये सततचे दुखणे, या टिप्स चुटकीसरशी देतील आराम



चुकीच्या पद्धतीने झोपणे, ताण घेणे आणि बराच वेळ एकाच शारीरिक स्थितीत बसणे यामुळे अनेक वेळा मान दुखू लागते. मान ताठ झाल्यामुळे होणारा त्रास कधी कधी असह्य होतो आणि त्यामुळे डोकेदुखीही सुरू होते. कधीकधी हे गर्भाशयाच्या ग्रीवेमुळे होऊ शकते, परंतु त्यातून आराम मिळणे खूप महत्वाचे आहे. मानदुखीवर लोक मलम लावतात, तर कधी औषध घ्यावे लागते. पण वेळोवेळी औषधांचा अवलंब करणे योग्य आहे का?

मानेच्या दुखण्याने इतका त्रास होतो की कामावर लक्ष केंद्रित करता येत नाही. एवढेच नाही तर इतरही अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. तसे, काही घरगुती उपायांच्या मदतीने तुम्ही या समस्येवर मात करू शकता. चला तुम्हाला काही टिप्स सांगतोष

जर तुम्हाला मानेच्या दुखण्यापासून मुक्ती मिळवायची असेल, तर ॲपल सायडर व्हिनेगरची मदत घ्या, जे अँटीऑक्सिडंटस आणि अँटी–इंफ्लेमेटरी गुणधर्मांनी परिपूर्ण आहे. यातील हे गुणधर्म स्नायूंचा ताण कमी करण्याचे काम करतात. सफरचंद व्हिनेगर टिश्यूमध्ये भिजवावे आणि मानेमध्ये दुखत असेल तेथे ठेवावे. दिवसातून किमान दोनदा ही रेसिपी फॉलो करा.

चहाच्या झाडाचे तेल किंवा लॅव्हेंडर तेलामध्ये अनेक घटक असतात, जे स्नायूंचा ताण कमी करू शकतात. मानदुखीतही याचा वापर करावा. नारळ किंवा मोहरीचे तेल घ्या आणि त्यात आवश्यक तेलाचे काही थेंब घाला आणि मानेवर मालिश करा. हे दिवसातून दोनदा करा आणि तुम्हाला काही वेळातच फरक दिसून येईल.

या समस्येपासून आराम मिळवण्यासाठी गरम पाण्याने आंघोळ करावी. यासाठी आंघोळीच्या पाण्यात मीठ मिसळून आंघोळ करावी. असे केल्याने तुम्हाला काही वेळात आराम मिळेल. जर तुमची मान दुखत असेल, तर ही पद्धत रोज फॉलो करा.

मानेचे दुखणे बरे करण्यासाठी तुम्हाला व्यायाम देखील करावा लागेल. तुम्हाला सरळ बसावे लागेल आणि हळूहळू तोंड एकदा डावीकडे आणि एकदा उजवीकडे हलवावे लागेल. शक्य तितके तोंड ताणून घ्या. गर्भाशयाच्या वेदनेपासून आराम देण्यासाठी हा व्यायाम खूप उपयुक्त आहे.

# राज्यातील मतदान केंद्रावरील मतदारांची संख्या कमी करण्याची निवडणूक आयोगाकडे मागणी

लातूर : राज्यात पुढील महिन्यात होणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीदरम्यान मतदान केंद्रावरील मतदारांची संख्या कमी करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे राज्य सरचिटणीस लायक पटेल यांनी एका लेखी निवेदनाद्वारे राज्याच्या मुख्य निवडणूक आयुक्तांकडे केली आहे.



महाराष्ट्र राज्य शिक्षक संघाच्या वतीने राज्याच्या मुख्य निवडणूक आयुक्तांना दिलेल्या निवेदनात पुढे असे नमूद करण्यात आले आहे की, आपल्या संघटनेकडे राज्यातील अनेक शिक्षकांनी मतदान केंद्रावर काम करत असताना शिक्षक व कर्मचाऱ्यांनी संघटनेकडे लेखी तक्रारी करून मतदान केंद्रावरील कामात बदल करण्याची मागणी केली आहे. मतदान केंद्रावर शहरी भागासाठी मतदार संख्या १ हजार ४०० व ग्रामीण भागासाठी १ हजार २०० अशी ठेवण्यात आलेली आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना मतदान केंद्रावर काम करत असताना मानसिक ताण निर्माण होणार आहे. तसेच मतदारांकडून प्रत्यक्ष मतदान करून घेताना अनेक अनेक अडचणी उदभवणार आहेत. त्यामुळे मतदान केंद्राची रचना करतानाच मतदारांची संख्या १ हजार ४०० ऐवजी हजार व १ हजार २०० ऐवजी ८०० अशी करून मतदान केंद्र तयार करण्यात यावेत. तसेच मतदान केंद्रावर एक महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाते. ग्रामीण भागात मतदान केंद्र असल्याने रात्री मुक्कामावेळी एका महिलेला अडचणी निर्माण होत असल्याने एकाऐवजी दोन महिला कर्मचारी करण्यात याव्यात. त्यामुळे त्यांना एकत्रित राहणे सोयीचे होईल. त्यामुळे निवडणुकीच्या कामावर ताण येणार नाही.

गर्भवती महिला व स्तनदा माता भगिनींना निवडणूक कामातून वगळण्यात यावे. तसेच बीएलओ चे काम राज्यात बहुतांश शिक्षकांना दिले गेले आहे. ते रद्द करण्यात यावे. कारण त्या शिक्षकांना शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी अडचणी निर्माण झाल्यामुळे गुणवत्तेवर परिणाम होत आहे. कर्मचाऱ्यांना दिला जाणारा निवडणूक भत्ता त्या – त्या कर्मचाऱ्यांच्या खात्यावर ऑनलाईन वर्ग करण्यात यावा, अशा मागण्या राज्याच्या मुख्य निवडणूक आयुक्तांकडे करण्यात आल्या आहेत. तसेच या निवेदनात शेवटी मुख्य निवडणूक आयुक्तांनी आपल्या मागण्या मान्य करून राज्यातील जिल्हाधिकाऱ्यांना तसे निर्देश देण्याचीही मागणी केली आहे. या निवेदनाची प्रत मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनाही देण्यात आल्याचे संघटनेचे राज्य सरचिटणीस लायक पटेल यांनी सांगितले. हे निवेदन आयोगाचे उपसचिव समीर रहाणे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. यावेळी लायक पटेल यांसह धाराशिवचे जिल्हाध्यक्ष बिभीषण पाटील यांची उपस्थिती होती.

# नळेगावचा जय जवान जय किसान सह. साखर कारखाना पुनरुज्जीवित करून न्याय द्या : एल.बी. आवाळे गुरुजी

लातूर : लातूर जिल्ह्यातील जवळपास सर्वच तालुके कार्यक्षेत्र असलेला आणि ३०० गावे आणि तब्बल ३०० एकर एवढ्या जमिनीवर विस्तारलेला चाकूर तालुक्यातील नळेगाव सहकारी साखर कारखाना कर्जाच्या खाईतून काढून पुनरुज्जीवित करून या भागातील हजारो ऊस उत्पादक शेजारी सभासदांना शासनाने न्याय मिळवून द्यावा,अशी मागणी या कारखान्याचे माजी संचालक एल.बी. आवाळे गुरुजी यांनी एका प्रसिद्धिपत्रकान्वये केली आहे.



नळेगावच्या या साखर कारखान्याच्या संदर्भात एल.बी. आवाळे गुरुजी यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात पुढे असे नमूद केले आहे की, जय जवान जय किसान सहकारी साखर कारखान्याची गाळप क्षमता प्रतिदिन १२५० मी. टन अशी असून कारखान्याचा पहिला गळीत हंगाम सन १९८६ ला सुरु झाला होता. या कारखान्याचे एकूण १० हजार ऊस उत्पादक शेतकरी सभासद आहेत. या साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रात अंदाजे १५ ते २० लाख मे. टन ऊसाचे उत्पादन केले जाते. एवढेच नाही तर कारखान्याच्या चारही बाजूनी १५ किमी. अंतरावर किमान ४ ते ५ लाख मेट्रिक टन ऊसाची उपलब्धता आहे. हा ऊस केवळ बैलगाडीच्या वाहतुकीनेही कारखान्यापर्यंत पोहचविणे सहज शक्य आहे, त्यामुळे या साखर कारखान्याचा आणि शेतकरी सभासदांचा वाहतूक खर्च मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकतो, त्याचा फायदा शेतकरी सभासदांनाच वाढीव दराच्या निमित्ताने मिळू शकतो. एवढेच नव्हे तर कारखाना हद्दीत चाकूर व शिरूर अनंतपाळ तालुक्यात ४ ते ५ लाख मे . टन उपलब्ध आहे. या साखर कारखान्याच्या एकूण कार्यक्षेत्राचे अवलोकन केले असता एकूण ९ केटीवेअर लघु माध्यम प्रकल्प कार्यान्वित आहेत. या कारखान्यावर दि. ३१ मार्च २००९ मूळ कर्ज ३५ कोटी रुपये एवढे होते. या थकीत कर्जापोटी दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि . मुंबई, विभागीय कार्यालय, नांदेड यांनी हा कारखाना ताब्यात घेतला तेव्हा दि. ११ ऑक्टोबर २०१३ रोजी थकीत कर्जाची थकबाकी व्याजासह ४० – ४५ कोटी झाली होती तेव्हा कारखान्यावर एड. संभाजीराव पाटील यांच्या नेतृत्वाखालील संचालक मंडळ कार्यरत होते. या कारखान्याच्या कार्यक्षेत्रात चाकूर व अहमदपूर तालुक्यातील अंदाजे एक हजार गावे , लातूर तालुका ४० गावे, औसा १० गावे, निलंगा, शिरूर अनंतपाळ तालुका ५० गावे, उदगीर ,देवणी तालुका ९० गावे, तर रेणापूर ( लातुर ग्रामीण) तालुक्यातील १० अशा अंदाजे ३०० गावांचे क्षेत्र असलेला हा लातूर जिल्ह्यातील सर्वात मोठा कारखाना आहे.

या साखर कारखान्यावर २००९ साली केवळ ३५ कोटी रुपयांचे कर्ज होते. आजघडीला या कारखान्याचे एकूण कर्ज थकीत व्याजासह फार फार तर ९० – ९५ कोटीच्या दरम्यान आहे. शासनाने थकीत व्याज माफ करण्याचा मौलिक निर्णय शेतकरी – कामगारांचे हित लक्षात घेऊन घेतल्यास हा साखर कारखाना कर्जमुक्त होण्यास वेळ लागणार नाही. या कारखान्यावर हजारो ऊस उत्पादक शेतकरी सभासद व शेकडो कामगारांचा चरितार्थ अवलंबून आहे. हा कारखाना विक्रीस काढण्याऐवजी प्रदीर्घ मुदतीने भाडेतत्वावर चालविण्यास देण्यात आला असता तरी आतापर्यंत हा साखर कारखाना कर्जमुक्त होऊ शकला असता. हा साखर कारखाना भाडेतत्वावर चालविण्यास घेण्यासाठी मांजरा परिवारालाही विनंती करण्यात आली होती. पण स्थानिक राजकारणामुळे तो प्रयत्न फोल ठरला. शासनाने अजूनही हा कारखाना भाडेतत्वावर चालविण्यास देण्याचा निर्णय घेतल्यास तो व्यवस्थितरीत्या चालवला जाऊन निश्चितच कर्जमुक्त होऊ शकतो. पण त्यासाठी राजकीय इच्छाशक्ती कमी पडताना दिसत आहे. जवळपास लातूर जिल्ह्यातील सहाही विधान मतदार संघाशी जोडला गेलेला हा एकमेव सहकारी तत्त्वावरील साखर कारखाना आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर या कारखान्याचे पुनरुज्जीवीकरण झाल्यास या भागातील हजारो ऊस उत्पादक शेतकऱ्यांची विवंचना कायमस्वरूपी मिटणार आहे. अंतर्गत मतभेद आणि मनभेद शेतकऱ्यांच्या, कारखान्याच्या कामगारांच्या हिताचा विचार करून दूर करून विधानसभा निवडणुकीपूर्वी त्याचप्रमाणे चालू गळीत हंगामात हा साखर कारखाना सुरु होईल या दृष्टीने सर्वतोपरी प्रयत्न व्हावेत, अशी अपेक्षा माजी संचालक एल.बी. आवाळे गुरुजी यांनी या प्रसिध्दीपत्रकान्वये व्यक्त केली आहे.

# पर्यावरण संवर्धनासाठी नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा -जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

लातूर :पर्यावरणाचा ऱ्हास ही सध्याच्या काळातील गंभीर समस्या बनली आहे. या पार्श्र्वभूमीवर नागरिकांनी वृक्षारोपण चळवळ गतिमान करावी व जास्तीत-जास्त वृक्ष लागवड करून वृक्षांचे संवर्धन करावे. कारण पर्यावरण संवर्धनासाठी नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी मंगळवारी काशीलिंगेश्र्वर नगर परिसरात आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमात बोलताना केले.

काशीलिंगेश्र्वर नगर भागातील ग्रामपंचायत कार्यालयासमोरील ग्रामपंचायत द्वारा विकसित केलेल्या ओपन स्पेस मध्ये जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पुढे बोलताना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे म्हणाल्या की, पर्यावरणाचा ऱ्हास टाळायचा असेल तर वृक्ष लागवड गरजेची आहे वृक्ष मानवाला ऑक्सिजन देतात. आपल्या येणाऱ्या पिढीसाठी ऑक्सिजन आवश्यक आहे. म्हणून नागरिकांनी एक व्यक्ती एक झाड अशी जिमेदारी घेऊन वृक्षांचे संवर्धन करावे.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. विनोद चव्हाण यांनी केले. नागरिकांच्या सहकार्याने व प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली ग्रीन बेल्टचे उत्तम असे आदर्श मॉडेल बनवू असे आश्र्वासन त्यांनी नागरिकांच्या वतीने दिले.

याप्रसंगी तहसीलदार सौदागर तांदळे, ग्रामसेवक शंकर भोसले, बांधकाम विभागाच्या उपअभियंता उषा मोतीपवळे, प्रा विनोद चव्हाण, लेखक विद्याधर कांदे-पाटील, ग्रामसेवक अनंत सूर्यवंशी, तलाठी विलास कतलाकुटे, रेनीसन्स स्कुलचे प्राचार्य महेश बांगर, शरद झरे, प्रा. सुधीर साळुंखे, नारायण नागरगोजे, पप्पू केळे, संतोष गेजगे, विजय धुमाळ, शशिकिरण सुरवसे, रमन मरे , गोपाळ कदमापुरे, रवी सूर्यवंशी, आशा जाधव, राणी नागरगोजे, सविता कातकडे, स्नेहा जाधव, स्वाती सूर्यवंशी, सुवर्णा बेनुरकर, समृद्धी देशपांडे, राजनंदिनी जाधव, अर्चना हेरकर, देवई गेजगे, उषा किनगावकर, संगीता कुलडवाड, चित्रा शेळके, पल्लवी गादेवाड आदींची उपस्थिती होती.

# जीवनाच्या निर्भेळ आनंदासाठी साहित्य आणि संगीताची उपासना करणे गरजेचे – प्रसिद्ध गायिका आसावरी बोधनकर-जोशी

लातूर : साहित्य आणि संगीत ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.साहित्य व संगीतातून जीवनाचा निर्भेळ असा आनंद मिळत असतो.म्हणूनच कलावंतांनी कलेची जोपासना व प्रत्येकांनी दर्जेदार अशा साहित्याचे वाचन केले पाहिजे.साहित्याची जाण आणि भान असले की,विचाराची प्रगल्भता आपोआप वाढते.म्हणूनच फेसबूक, व्हाट्सअप,इंटरनेट,मोबाईल या आभासी जगात जास्तीचे रममाण न होता प्रत्येकांनी साहित्य,संगीत,कला आणि क्रीडा यांच्याशी मैत्री केली पाहिजे.अभ्यासासोबत सुप्त कलागुणांना वाव देत विद्यार्थ्यांनी स्वर-संगीताची साधना केली पाहिजे.साहित्य वाचन व कलेमुळे आपले नावलौकिक जागतिक पातळीवर होते,असे प्रतिपादन स्टार प्रवाह,मी होणार सुपरस्टार फेम प्रसिद्ध गायिका आसावरी बोधनकर-जोशी यांनी केले.

येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.०७ ऑक्टोंबर २०२४ रोजी ' साहित्य आणि सांस्कृतिक मंडळा' चे शानदार उद्घाटन झाले.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आपल्या ' जय शारदे वागेश्र्वरी', 'गुलाबी साडी' ,' मेरे ढोलना ' अशा सुमधूर गीतगायनाच्या माध्यमातून सर्वांना मंत्रमुग्ध करून त्यांनी अनमोल असे मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे



होते.याप्रसंगी व्यासपीठावर ' साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ प्रभारी प्राध्यापक व इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.मेघा पंडित,मंडळातील डॉ.चंद्रशेखर स्वामी,डॉ.गजानन बने,डॉ.रामशेट्टी शेटकार,मंडळ अध्यक्ष सायली पंडित यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षीय समारोप करताना प्रभारी प्राचार्य डॉ. सिद्धेश्र्वर बेल्लाळे असे म्हणाले की,विद्यार्थ्यांनी शैक्षणिक अभ्यासक्रमाबरोबर आपल्या सुप्त कलागुणांना वाव देत उत्तम गायक,कलाकार झाले पाहिजे.कारण एक कलाकार लाखो लोकांच्या हृदयावर अधिराज्य करतो.म्हणूनच उत्तम कलाकार म्हणून युवक महोत्सव, इतरत्र महाविद्यालयाचे नावलौकिक सर्वत्र झळकाविले पाहिजे.

प्रास्ताविक मंडळ अध्यक्ष सायली पंडित यांनी केले तर आभार सुदर्शन बेंडले यांनी मानले. सूत्रसंचालन पर्णवी ढवारे व ऋतुजा उगिले यांनी संयुक्तरित्या केले.स्वागतगीत तबसूम शेख हिने म्हटले तर प्रमुख पाहुण्याचा परिचय दुर्गा जाधव यांनी करून दिले.'उन्मेष' मध्ये सर्वोत्कृष्ट लेखन केल्याबद्दल मराठीतून शितल राठोड,पर्णवी ढवारे,इंग्रजीमधून श्रेया मुंडे,हिंदीमधून दीक्षा कांबळे,श्रेया पुरी यांचाही सत्कार करण्यात आला तसेच योगेश्र्वरी डुकरे या विद्यार्थिनीस नवोदित साहित्यिक अमृत गौरव पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल व महाराष्ट्र गौरव पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल प्रमुख पाहुण्याच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला.त्याचबरोबर ऋतुजा उगिले या विद्यार्थीनीने संगीत या विषयावर तयार केलेले पोस्टर प्रमुख पाहुण्याना भेट म्हणून देण्यात आले.वाचक आपल्या भेटीला उपक्रमांतर्गत ' मला आवडलेले पुस्तक ' यावर तृप्ती बिराजदार व वैभवी माने यांनी पोस्टर तयार केल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला.याप्रसंगी डॉ.मनीषा गुरमे, सुनील राक्षे,शंकर भालके,हरिओम पाटोळे,राजसाहेब पांचाळ, मंडळातील प्रज्वल जाजे यांच्यासह बी.एस्सी.,बीसीएस आणि बायोटेकचे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# नवरात्रीत देवीकडून भक्ताविषयी अपेक्षा व नवरात्रीचे महत्व इंजि. सौ. शितल अ. सवासे

नवरात्र हा भारतीय संस्कृतीतील एक महत्त्वाचा सण आहे, जो धार्मिक, आध्यात्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्व ठेवतो. भक्तांच्या जीवनात ही काळजी आणि आशीर्वादाची भर देतो. तसेच जो देवी दुर्गेच्या आराधनेसाठी साजरा केला जातो. नवरात्री म्हणजे नव (नऊ) रात्री, ज्यामध्ये विविध स्वरूपांतील देवींची पुजा केली जाते. नवरात्र हा देवीच्या उपासनेसाठी अत्यंत शुभ काळ मानला जातो. या दिवसांत देवीची अपेक्षा म्हणजे भक्तांनी भक्तिभावाने तिची पुजा, आराधना आणि सेवा करावी, तिच्या गुणांचे चिंतन करावे, आणि जीवनात सत्य, न्याय, शुद्धता, आणि भक्तीचे पालन करावे. देवीची अपेक्षा ही तिच्या भक्तांना प्रगती, सुख-समृद्धी, आणि आंतरिक शांती प्रदान करणे असते. नवरात्राचे दिवस हे आत्मपरीक्षण, सेवा, आणि साधना करण्याचे दिवस आहेत, जेव्हा देवीच्या इच्छेनुसार जीवन घडवण्याचा प्रयत्न प्रत्येक भक्ताने करावा.

सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके।
शरण्ये त्र्यम्बके गौरी नारायणि नमोऽस्तुते।।

या श्र्लोकात देवी दुर्गेला नमस्कार केला जातो, ज्यामुळे भक्तांच्या मनात भक्तिभाव जागृत होतो. देवीची कृपा प्राप्त करण्यासाठी हे नामस्मरण अत्यंत प्रभावी आहे, ज्यामुळे भक्तांना मानसिक शांतता आणि आंतरिक शक्ती मिळते. भक्तांना संकटांच्या काळात संरक्षण मिळवता येते. देवीच्या नामस्मरणाने संकटांना तोंड देण्याची शक्ती वाढते आणि मनाला धैर्य प्राप्त होते. या मंत्राचे नियमित उच्चारण करणे व्यक्तीच्या जीवनात सकारात्मकता आणि आनंदाची लहर आणते. मनाची शुद्धता, सकारात्मक विचार आणि अंतःशांती साधण्यासाठी हे नामस्मरण उपयोगी ठरते. सर्वार्थ साधिके या अर्थामुळे देवी सर्व इच्छांची पूर्तता करणारी आहे. तिच्या नावाचा उच्चारण केल्याने भक्तांच्या इच्छांचे पूर्ण होण्याची संभाव्यता वाढते. भक्तांची सर्व प्रकारची मागण्या आणि इच्छांचे समाधान मिळवण्यासाठी या मंत्राचे प्रभावी स्थान आहे. या मंत्राचे सामूहिक उच्चारण (जसे की जप, भजन, कीर्तन) समाजातील एकता वाढवते आणि भक्तांमध्ये आपसी प्रेम व भाईचारा निर्माण करते. धार्मिक एकतेची भावना वाढवून समाजात सकारात्मक बदल घडवतो. हे नामस्मरण भक्तांना नैतिक आचारधर्माचे पालन करण्याची प्रेरणा देते, ज्यामुळे त्यांच्या जीवनातील गुण आणि सदाचार वाढतात. देवीच्या गुणांचे चिंतन करून भक्त उच्च विचार, शुद्धता आणि सात्त्विकता साधू शकतात. या मंत्राचे स्मरण ध्यान किंवा साधना दरम्यान करण्यात आले असता मन शांत होते आणि ध्यान गहन होते. ध्यानामध्ये एकाग्रता साधण्यासाठी हा मंत्र अत्यंत उपयुक्त आहे. श्र्लोकाच्या उच्चारणाने मनाला शांती प्राप्त होते, आणि भक्तीचा भाव व्यक्त करण्याची संधी मिळते. नमोऽस्तुते या वाक्यामुळे समर्पणाची भावना वाढते, ज्यामुळे भक्ताला आत्मविसर्जनाचा अनुभव येतो.



नवरात्रीत देवीकडून भक्ताविषयी अपेक्षा:

१. शुद्ध मनाने पुजा: देवीला प्रेम आणि भक्तिभावाने केलेली पुजा प्रिय आहे. यामध्ये अहंकारविरहित शुद्ध भावनेने तिची स्तुती करणे आणि तिच्या गुणांचे स्मरण करणे आवश्यक आहे.

२. आत्मशुद्धी आणि तपस्या: नवरात्रीच्या काळात उपवास, ध्यान, आणि आत्मपरीक्षणाद्वारे आत्मशुद्धीची साधना करणे ही देवीची अपेक्षा असते, ज्यामुळे आपण आपले जीवन सुधारू शकतो.

३. सदाचार आणि सेवाभाव: देवीची कृपा मिळविण्यासाठी सदाचाराचे पालन करणे आणि इतरांच्या सेवेसाठी तत्पर राहणे हे अत्यंत आवश्यक असते. देवी आपल्या भक्तांकडून निष्कलंक जीवनशैली, उदारता, आणि इतरांसाठी प्रेम आणि करुणा अपेक्षित करते.

४. सामाजिक सद्भावना: देवी आपल्या भक्तांकडून समाजात एकतेची भावना आणि परस्पर प्रेम वाढवण्याची अपेक्षा ठेवते, ज्यामुळे सर्वांमध्ये शांती आणि समृद्धी येईल.

५. शक्तीचा योग्य वापर: देवी म्हणजे शक्तीचे प्रतीक आहे. तिची अपेक्षा असते की, भक्तांनी त्यांची ऊर्जा आणि शक्ती चांगल्या कामांसाठी वापरावी, आत्मिक विकास साधावा आणि समाजात सकारात्मक बदल घडवावा.

नवरात्राचे महत्त्व

१. धार्मिक:- नवरात्रीमध्ये देवी दुर्गेच्या नव स्वरूपांची पुजा केली जाते, ज्यामुळे भक्तांना तिच्या शक्ती, कृपा आणि संरक्षणाची अपेक्षा असते. हा सण शक्ती, साहस आणि विजयाचे प्रतीक आहे. देवी दुर्गा राक्षसांचा नाश करून धर्माची स्थापना करते, ज्यामुळे भक्तांना विश्र्वास आणि प्रेरणा मिळते.

२. आध्यात्मिक:- भक्तांना आत्मचिंतन, साधना आणि ध्यान करण्याची संधी मिळते. या काळात उपवास, प्रार्थना आणि ध्यान यांचे महत्व वाढते. या काळात मन, वचन आणि क्रिया यांचे शुद्धीकरण करण्याची संधी मिळते, ज्यामुळे आत्मिक विकास साधता येतो.

३. सामाजिक :- नवरात्री म्हणजे एकत्र येण्याचा, भक्ती, प्रेम आणि एकतेचा काळ. लोक एकत्र येऊन पुजा करतात, भजन-कीर्तन करतात, आणि एकमेकांना शुभेच्छा देतात. या काळात विविध सांस्कृतिक कार्यक्रम, नृत्य आणि संगीताचे आयोजन केले जाते, ज्यामुळे समाजातील एकता आणि सांस्कृतिक वारसा वाढतो.

४. संपूर्ण वर्षासाठी सकारात्मक ऊर्जा:- नवरात्रीच्या काळात देवीची आराधना केल्याने भक्तांना सकारात्मक ऊर्जा मिळते, जी संपूर्ण वर्षभर टिकते. या काळात केलेले व्रत, उपासना आणि साधना व्यक्तीच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणू शकते.

५. परंपरा आणि संस्कृती:- नवरात्रीच्या सणाने भारतीय संस्कृतीतील विविध परंपरा जिवंत राहतात. यामध्ये कर्णधार, शारदीय नवरात्री, आणि घटस्थापना यांसारख्या पद्धतींचा समावेश आहे. हा सण देशभर विविध प्रकारे साजरा केला जातो, ज्यामुळे विविधता आणि एकात्मता यांचे प्रतिनिधित्व होते.

सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके या श्र्लोकाचे नामस्मरण भक्तांच्या जीवनात आध्यात्मिक, मानसिक आणि नैतिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण ठरते. हे भक्तांना दिव्यतेच्या अनुभवाच्या जवळ आणते आणि जीवनातील सर्व प्रकारच्या संकटांना तोंड देण्याची शक्ती प्रदान करते. नवरात्राचे दिवस हे आत्मपरीक्षण, सेवा, आणि साधना करण्याचे दिवस आहेत, जेव्हा देवीच्या अपेक्षानुसार जीवन घडवण्याचा प्रयत्न प्रत्येक भक्ताने करावा. नवरात्री हा एक अद्वितीय सण आहे, जो धार्मिक, आध्यात्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्व ठेवतो. भक्तांच्या जीवनात ही काळजी आणि आशीर्वादाची भर देतो.

# राष्ट्रीय जागरण मंचच्या वतीने वक्ता प्रबोधन कार्यशाळा संपन्न

लातूर : कांही जणांकडून समाजाला भ्रमित करण्यासाठी खोटे नॅरेटिव्ह पसरवून एकगठ्ठा मतदान पाडून घेण्याची नवी पद्धत नुकत्याच झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत पहायला मिळाली, ही एकगठ्ठा (व्होट जिहाद) मतदानाची पद्धत लोकशाहीसाठी घातक असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध वक्ते सुधीर थोरात यांनी केले ते शहरातील बार्शी रोड वरिल प्रणवश्री मंगल कार्यालयात रविवार (दि.६) रोजी आयोजित वक्ता प्रबोधन कार्यशाळेत बोलत होते.

पुढे बोलताना ते म्हणाले, देशभरात नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत कांही मंडळींनी व्होट जिहाद करत एकगठ्ठा मतदान मिळवण्यात यश मिळवले परंतु ही पद्धत लोकशाहीसाठी घातक असून धोक्यांची जाणीव ठेवून जिल्ह्यातील सर्व वक्त्यांनी जनजागृती करावी असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. कार्यशाळेच्या प्रास्ताविकात धनंजय कुलकर्णी यांनी, लातूर जिल्ह्यातील वक्त्यांची प्रबोधनाची आवश्यकता ओळखून कार्यक्रमाचे आयोजन केल्याचे सांगितले. या वक्ता प्रबोधन कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात बोलतांना, प्रसिद्ध वक्ते गोरक्षनाथ अभुज यांनी हिंदुत्वावरील आव्हाने व उपाय या विषयावर प्रकाश टाकला. हिंदुत्वाचे काम करताना दिशा ९० डिग्री मध्ये वळवण्याची गरज आहे. कांही मंडळीकडून खोटा इतिहास समोर आणायचे प्रकार वाढत आहेत. जगद्गुरू तुकोबारायांना हिंदूपासून दूर नेण्याचे प्रयत्न वाढले आहेत. वैष्णवांचा मेळा



एकत्र येऊन वारीत जातात परंतु वारीमध्ये भेदभाव करून वारी जातीत विभागण्याचे षडयंत्र सुरु आहे. वारीला हिंदू पासून तोडण्याचा ही प्रयत्न सुरु आहे. वारीत घुसखोरी केली जात असून वारकऱ्यांमध्ये वेगवेगळे खोटे नॅरेटीव्ह सेट केला जातो आहे. एकीकडे गाईसाठी भाकरी काढणारा आहे तर दुसरीकडे गाईसोबत भाकरी खाणारा आहे. त्यामुळे सर्वांनी सत्य समजून खोटे नॅरेटिव्ह खोडून खोटे नॅरेटिव्ह पसरविणाऱ्यांना त्यांची जागा दाखवून द्यावी असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या तिसऱ्या सत्रात ड.आशिष जाधवर यांनी वक्फ बोर्ड दुरुस्ती कायद्यावर मार्गदर्शन केले. यासोबतच त्यांनी १८ मे २०१४ रोजी च्या गार्डीअन या सुप्रसिद्ध वृतपत्रातील एडोटोरियलमध्ये प्रकाशित करण्यात आलेल्या मजकूरावर प्रकाश टाकला. त्यात असे लिहले होते की, आम्ही ब्रिटिश कायमचे आज भारतातून निघत आहोत. कारण आजपर्यंत भारतात देशाचा विचार करणारे राष्ट्रवादी सरकार नव्हते. आता नरेंद्र मोदींच्या रूपाने ते आले आहे त्यामुळे आम्ही आता भारतातून कायमचा काढता पाय काढत असल्याचे म्हटले आहे. पुढे बोलताना ते म्हणाले, भारतीय सैन्य आणि रेल्वे यांच्यानंतर वक्फ बोर्ड कडे सर्वाधिक भूमी आहे. वर्ष २००९ मध्ये वक्फ बोर्डच्या मालमत्ता ४ लाख एकर भूमीवर पसरल्या होत्या. त्यानंतर पुढील १३ वर्षात वक्फ बोर्डच्या मालमत्तांमध्ये दुपटीने वाढ झाल्याचे स्पष्ट झाले असल्याचे सांगितले. यावेळी त्यांनी वक्फ बोर्डला जमीन मालकी मिळण्याविषयी करण्यात आलेल्या तरतुदींवर प्रकाश टाकला. महाराष्ट्राला इस्लामी वक्फ बोर्डाचा विळखा बसला असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. वक्फ बोर्डाकडे विविध राजकीय पक्षाची मेहरबानी कशापद्धतीने सुरु आहे याकडे ही त्यांनी यावेळी लक्ष वेधले. वक्फच्या नावाखाली गैरव्यवहारच जास्त होत असल्याचा आरोप ड.आशिष जाधवर यांनी यावेळी केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किशोर पवार यांनी केले तर आभार नामदेव व्यंजने यांनी मानले. यावेळी जिल्ह्यातील वक्त्यांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

## तीनशे दिव्यांग व अंध कुटुंबाला दिवाळीत किराणा किट मोफत देणार ; दानशूर व्यक्तीने मदतीचा हात द्यावा – संगीता चोपडा



लातूर : भारतीय संस्कृतीमध्ये प्रत्येक सणाला महत्त्व दिले जाते त्यात विशेषता दसरा दिवाळी म्हणजे खास सण होय. हसन प्रत्येक जण साजरा करताना आपण नेहमी पाहतो. दिवाळी म्हटले की एक प्रकारचा उत्सवच म्हणायला हरकत नाही. हा उत्सव साजरा होताना समाजातील एक ही कुटुंब लांब राहता कामा नये अशी तळमळीची भावना ठेवून लातूरच्या जीवनदीप फाउंडेशनने पुढाकार घेऊन येणाऱ्या दिवाळीपूर्वी ३०० दिव्यांग व अंध कुटुंबाला मदतीचा हातभार म्हणून मोफत किराणा किट देण्याचे आयोजन केले आहे. अशी माहिती फाउंडेशनच्या संचालिका संगीता चोपडा यांनी दिली.

आपल्या संस्कृतीमध्ये आपण प्रत्येक सणांमध्ये आनंदाने आणि उत्साहाने पूर्ण परिवार सहभागी राहत असतो वर्षभरात अनेक सण साजरा करताना दसरा दिवाळीला विशेष महत्त्व प्राप्त आहे. या सणात कोणी घर, प्लॉट तर कोणी मोटार गाडी, चार चाकी वाहने आधी नाना विविध प्रकारची खरेदी केली जाते. यातच सोने–चांदी तर नक्कीच खरेदी करताना महिला प्रामुख्याने प्रथम दर्शनी दिसतात. मग हे सण सर्वांसाठी साजरे होत असताना आपल्या समाजात विविध समाजातील जातीतील कोणताही कुटुंब वंचित राहू नये, अशी भावना उराशी बाळगून लातूर येथील गेल्या दहा वर्षापासून सामाजिक कार्य सेवा बजावणाऱ्या नवदुर्गा म्हटले तरी चुकीचे वाटणार नाही अशा जीवनदीप फाउंडेशन च्या संचालिका संगीता चोपडा होय. या सोबतच त्यांच्या सहकार्यांनी मिळून एक नवा उपक्रम हाती घेऊन माणुसकीचे, मानवतेचे, एकात्मतेचे, दर्शन घडविण्याचे प्रयोजन केले आहे. ते म्हणजे दिव्यांग व अंध कुटुंबांना मोफत दिवाळी किराणा किट देण्याचा नवा संकल्प आखला आहे. साजरी करताना आपण हे दिव्यांग व अंधाच्या कुटुंबासोबत हा उत्सव साजरा करूया व त्यांच्याही आनंदात आपण सामील होऊया अशी संकल्पना फाउंडेशनने केली आहे. जीवनदीप फाउंडेशन च्या वतीने समाजातील दानशूर व्यक्तीने आपापल्या परीने आर्थिक मदतीचा हात द्यावा असे आवाहनही करण्यात आले आहे. जेणेकरून आपल्या सर्वांच्या मदतीमुळे त्यांनाही चांगल्या प्रकारे दिवाळी उत्सव साजरा करता येईल असेही त्या म्हणाल्या यासाठी दानशूर व्यक्तींनी फाउंडेशनच्या संचालिका संगीता चोपडा मोबाईल क्रमांक ९१५८७९४००० या नंबर वर संपर्क करावा असे आवाहन फाउंडेशन च्या वतीने करण्यात आले आहे.

## भाजप नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडून भिसे कुटुंबियांचे सांत्वन



लातूर – लातूर ग्रामीण मतदार संघातील माजी आमदार श्री. त्र्यंबक भिसे यांच्या मातोश्री कमलबाई श्रीरंगराव भिसे यांचे नुकतेच निधन झाल्याने भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी मंगळवारी दुपारी रेणापूर तालुक्यातील मौजे भोकरंबा येथील त्यांच्या निवासस्थानी जावून भिसे कुटुंबीयांचे सांत्वन केले.

स्व. कमलबाई भिसे यांच्या प्रतिमेस आ. रमेशआप्पा कराड यांनी श्रद्धांजली अर्पण केली व भिसे कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी कृषी अधिकारी मोहनराव भिसे, माजी आमदार त्र्यंबक भिसे यांच्यासह भिसे कुटुंबातील अनेकजण होते. यावेळी आ. कराड यांच्या समवेत भाजपा पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, भाजपा रेणापूर तालुकाध्यक्ष ॲड दशरथ सरवदे, रेणापूरचे माजी नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, ॲड. मनोज कराड, प्रताप पाटील, उमेश बेद्रे, विजय चव्हाण, रामहरी गोरे यांच्यासह अनेकजण होते.

# कमी पाणी प्यायल्यामुळे फक्त किडनीच नाही तर हे ४ अवयव होतात निकामी

आपल्या शरीरासाठी पाणी खूप महत्वाचे आहे आणि जेव्हा आपण आजारी पडतो किंवा आरोग्याशी संबंधित कोणत्याही प्रकारची समस्या उद्भवते तेव्हा आपल्याला इतर आरोग्य सल्ल्यांसोबत भरपूर पाणी पिण्याचा सल्ला दिला जातो. आपल्या शरीराच्या प्रत्येक अवयवाला पाण्याची गरज असते. जर तुम्ही रोजच्या तुलनेत कमी प्रमाणात पाणी प्याल तर त्यामुळे आपल्या आरोग्याशी संबंधित अनेक समस्या निर्माण होतात. त्याच वेळी, जेव्हा शरीरातील पाणी हळूहळू कमी होऊ लागते, तेव्हा शरीराच्या अनेक भागांवर देखील परिणाम होऊ लागतो. काही लोकांना असे वाटते की जेव्हा शरीरात पाण्याची कमतरता असते तेव्हा आपल्या किडनीवर परिणाम होतो. शरीरात पाण्याच्या कमतरतेचा परिणाम फक्त किडनीवर होत नाही तर शरीराच्या इतर अनेक भागांवरही त्याचा परिणाम होऊ शकतो, ज्याबद्दल आम्ही तुम्हाला या लेखात सांगणार आहोत. याबाबत माहिती या लेखात जाणून घेणार आहोत.

मेंदू

मेंदू हा आपल्या शरीरातील सर्वात महत्वाचा अवयव आहे, ज्याचे कार्य देखील खूप गुंतागुंतीचे आहे. जर तुमचा मेंदू नीट काम करू शकत नसेल तर शरीरात पाण्याची कमतरता हे देखील असू शकते.



जर तुम्ही खूप कमी पाणी प्याल आणि डिहायड्रेट झाला तर तुमच्या किडनीवरही याचा परिणाम होऊ शकतो.

हृदय

आजकाल, हृदयाशी संबंधित आजारांचा धोका वाढत आहे, जो पाण्याच्या कमतरतेमुळे खराब जीवनशैली आणि अस्वस्थ आहारामुळे देखील होऊ शकतो. वेळेवर पाणी न पिणे किंवा पुरेसे पाणी न पिणे हे देखील तुमच्या वाईट जीवनशैलीचा किंवा अस्वस्थ आहाराचा भाग असू शकतो. शरीरात पाण्याची कमतरता हृदयावर परिणाम करू शकते आणि त्यामुळे हृदयविकाराचा धोका वाढतो.

यकृत

शरीरात पाण्याच्या कमतरतेमुळे तुमचे यकृतही खराब होऊ शकते आणि विशेषत: ज्यांचे यकृत नीट काम करत नाही अशा लोकांनी त्यांच्या शरीरात पाण्याचा पुरवठा निश्चितपणे राखला पाहिजे. पाण्याशिवाय आपल्या शरीरातील इतर अवयवांप्रमाणे यकृतावरही गंभीर परिणाम होऊ शकतो, त्यामुळे अनेक गंभीर आजारांचा धोकाही वाढतो.

आतडे

शरीरात पाण्याच्या कमतरतेमुळे आतड्यांवरही परिणाम होतो. त्यामुळे बद्धकोष्ठता इत्यादी समस्या देखील दिसू शकतात. शरीरात पाण्याच्या कमतरतेमुळे पचनक्रिया नीट होत नाही. ज्याचा थेट परिणाम तुमच्या आतड्यांच्या आरोग्यावर होतो. जर तुम्ही पुरेसे पाणी प्यायले नाही तर त्याचा परिणाम हळूहळू तुमच्या आतड्यांवर होऊ शकतो.

# बिग बॉस विजेत्या सूरज चव्हाण चा प्रेरणादायी प्रवास

कलर्स मराठी वाहिनीवर सुरू असलेल्या बिग बॉस या रिलिटी शो चा ग्रँड फिनाले रविवारी रंगला आणि या अपेक्षेप्रमाणे सूरज चव्हाण हा या रिलिटी शो चा विजेता ठरला. सूरज चव्हाण या शो चा विजेता ठरावा अशी प्रेक्षकांची ईच्छा होती कारण अल्पावधीतच त्याने प्रेक्षकांच्या मनात घर केले होते. त्याचा भोळसट स्वभाव आणि निरागस वागणूक यामुळे प्रेक्षक त्याच्या प्रेमात पडले होते. मनोरंजन क्षेत्रातील अनेक दिग्गज कलाकार या शो मध्ये त्याचे प्रतिस्पर्धी होते त्यामुळे त्याला कोणीच जमेस धरले नव्हते. टीकटॉक वर स्वतःचे काही सेकंदाचे व्हिडिओ बनवून टाकणारा सूरज चव्हाण हा या शो चा विजेता ठरेल असे सूरज वगळता कोणालाच वाटले नव्हते. सूरजला मात्र स्वतः वर विश्र्वास होता आणि याच विश्र्वासाच्या जोरावर तो विजेता ठरला. काहीही करून हा शो जिंकायचाच असा विचार करून तो शो मध्ये उतरला आणि त्याने स्वतः ला सिद्ध केले. सूरज बिग बॉस चा विजेता ठरला असला तरी त्याचा इतपर्यंत चा प्रवास सोपा नव्हता. बारामती येथे जन्मलेल्या सूरज चव्हाणचे बालपण अतिशय खडतर अवस्थेत गेले. सूरज चव्हाण लहान असतानाच त्याचे आई वडील वारले. लहानपणीच आई वडिलांचे छत्र हरपलेल्या सूरज चव्हाणचा सांभाळ त्याच्या मोठ्या बहिणीने केला. त्याला एकूण पाच बहिणी आहेत. घरची परिस्थिती हालाखीची असल्याने आठवितच सूरजला शाळा सोडून द्यावी लागली. घरची परिस्थिती हलाखीची असल्याने एक वेळचे जेवण मिळणे देखील मुश्कील



त्यामुळे कित्येकदा तो उपाशी किंवा अर्धपोटीच झोपत असे. पोटाची खळगी भरण्यासाठी त्याने मंदिरातील नैवद्य खाऊन दिवस काढले. किशोर वयातच त्याला सोशल मिडियाचे वेड लागले. इतर मुलांसारखे तो ही टिक टॉक या सोशल मीडिया साईट वर स्वतःचे व्हिडिओ काढून टाकू लागला. अल्पावधीतच त्याचे व्हिडिओ लोकप्रिय झाले आणि बघता बघता तो महाराष्ट्रात फेमस झाला तो त्याच्या आगळ्या वेगळ्या शैलीने, त्याचे डायलॉग अक्षरशः वाऱ्या सारखे व्हायरल झाले. गुलिगत धोका, बुक्कित टेंगुळ, झापुक झुपुक, मरीआई पावली या सारखे त्याचे कितीतरी डायलॉग हिट झाले आणि तो टिक टॉक स्टार झाला. टिक टॉक यू ट्यूब कडून त्याला पैसेही मिळाले पण सुरुवातीला त्याच्या भोळ्या स्वभावामुळे ते त्याच्या पर्यंत पोहचले नाही तरीही त्याची काही तक्रार नव्हती. तो त्याचे व्हिडिओ, रिल्स बनवून प्रेक्षकांसमोर येतच होता. त्याची लोकप्रियता वाढतच होती. त्याच्या याच लोकप्रियतेचा फायदा घेण्यासाठी कलर्स मराठी वाहिनीने त्याला बिग बॉस शो ची ऑफर दिली. सुरुवातीला सूरज बिग बॉसच्या घरात यायला तयार नव्हता. पण कलर्स वाहिनीने त्यांचा हट्ट सोडला नाही अखेर सूरज चव्हाण बिग बॉसच्या घरात यायला तयार झाला आणि आज सूरजने थेट बिग बॉसच्या ट्रॉफी वर नाव कोरत इतिहास घडवला. काही जण त्याच्या या विजयावर प्रश्नचिन्ह उपस्थित करून म्हणतात की बिग बॉस प्रि प्लॅंड होतं पण तळागाळातील सर्वसामान्य मुलासासाठी कोण प्लॅन करणार ? कोण त्याचा एवढा विचार करणार ? ते पण एवढ्या मोठ्या कसलेल्या कलाकारांसमोर. सूरज चव्हाण त्याच्या कष्टाच्या आणि जिद्दीच्या बळावर ईथवर पोहचला आहे. आता त्याच्या कष्टाचे चीज झाले असे म्हणावे लागेल. बिग बॉस विजेत्या सूरज चव्हाणचे मनापासून अभिनंदन !!

**श्याम ठाणेदार ,दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## लातूर ग्रामीण मतदार संघातील ८५ कामासाठी आ. कराड यांच्या प्रयत्नातून ५ कोटीचा निधी

लातूर– राज्याच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग अंतर्गत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजने अंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकाच्या वस्त्यांचा विकास करण्यासाठी भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या प्रयत्नातून लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील ८५ कामासाठी तब्बल ५ कोटी रुपयांचा निधी नुकताच मंजूर झाला आहे.



लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील विविध गावातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीत मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी विविध विकास कामांना निधी मिळावा याकरिता भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी राज्याचे मुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस, आणि जिल्ह्याचे पालकमंत्री मा. गिरीशजी महाजन यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला. केलेल्या पाठपुराव्यानुसार तब्बल ५ कोटी रुपये खर्चाच्या ८५ कामांना राज्याच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने ७ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार मंजुरी दिली आहे.

शासनाने मंजुरी दिलेल्या लातूर ग्रामीण मतदार संघात लातूर तालुक्यातील ३९ गावातील ४२ कामासाठी २ कोटी ५८ लक्ष, रेणापूर तालुक्यातील ३० गावातील ३० कामासाठी १ कोटी ७४ लक्ष आणि औसा तालुक्यातील भादा सर्कल मधील १२ गावातील १२ कामासाठी ६८ लक्ष रुपयाचा निधी मंजूर झाला आहे. मंजूर झालेल्या सदरील निधीतून दलित वस्ती अंतर्गत रस्ता व नाली बांधकाम करणे, समाज मंदिर बांधकाम करणे, परिसर विकासीत करणे, अंतर्गत पेव्हर / सिमेंट रस्ता करणे, विद्युतीकरण करणे, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर उद्यान परिसर विकसित करणे, अण्णाभाऊ साठे सभागृह परिसर विकसित करणे यासह विविध कामे करण्यात येणार आहेत.लातूर ग्रामीण मतदार संघात लातूर तालुका – भोईसमुद्रगा ५ लक्ष, भातांगळी ५ लक्ष, चिंचोली (ब) ७ लक्ष, चिंचोलीराव ७ लक्ष, सावरगाव ७ लक्ष, चिकलठाणा ५ लक्ष, शिराळा ७ लक्ष, कासारखेडा ७ लक्ष, मुरुड अकोला ५ लक्ष, मळवटी ५ लक्ष, दिंडेगाव ५ लक्ष, कारसा ५ लक्ष, गातेगाव ७ लक्ष, अंकोली ७ लक्ष, मुरुड ७ लक्ष, मुरुड ७ लक्ष, जवळा बु. ७ लक्ष, पिंपळगाव अंबा ७ लक्ष, सलगरा बु. ७ लक्ष, कासारजवळा ५ लक्ष, बामणी ७ लक्ष, सलगरा खु. ७ लक्ष, निवळी ७ लक्ष, धनेगाव ७ लक्ष, सारसा ७ लक्ष, मांजरी ५ लक्ष, भातखेडा ५ लक्ष, काटगाव ५ लक्ष, बिंदगीहाळ ५ लक्ष, भाडगाव ७ लक्ष, माटेफळ ५ लक्ष, करकट्टा ५ लक्ष, शिऊर ५ लक्ष, तांदूजळा ५ लक्ष, भोयरा ५ लक्ष, गावधवड ७ लक्ष, बोडका ७ लक्ष, मसला ५ लक्ष, मुरुड ६ लक्ष, टाकळी शि ५ लक्ष, एकुरगा ७ लक्ष, बामणी ५ लक्ष, सावरगाव ५ लक्ष आणि रेणापूर तालुका – भोकरंबा ७ लक्ष, समसापूर ७ लक्ष, शेरा ७ लक्ष, सुमठाणा ५ लक्ष, दिवेगाव ५ लक्ष, हारवाडी ७ लक्ष, भंडारवाडी ५ लक्ष, खरोळा ७ लक्ष, वाला ५ लक्ष, सांगवी ५ लक्ष, टाकळगाव ५ लक्ष, चाडगाव ५ लक्ष, कारेपूर ७ लक्ष, पानगाव ७ लक्ष, पाथरवाडी ५ लक्ष, बिटरगाव ७ लक्ष, खलंग्री ७ लक्ष, घनसरगाव ७ लक्ष, बावची ५ लक्ष, माकेगाव ७ लक्ष, डि. देशमुख ५ लक्ष, रामवाडी (ख) ५ लक्ष, गव्हा ण ५ लक्ष, कोष्टागाव ५ लक्ष, गोढाळा ५ लक्ष, निवाडा ५ लक्ष, सेलु खु. ५ लक्ष, तळणी ७ लक्ष, मोटेगाव ५ लक्ष, पानगाव ५ लक्ष. तर औसा तालुक्यातील भादा सर्कल मधील भादा सर्कल – काळमाथा ७ लक्ष, वानवडा ७ लक्ष, भादा ७ लक्ष, कवठा केज ५ लक्ष, लखनगाव ५ लक्ष, समदर्गा ५ लक्ष, शिवली ५ लक्ष, टाका ५ लक्ष, वडजी ५ लक्ष, वरवडा ५ लक्ष, सिंदाळा ५ लक्ष, बोरगाव न. ७ लक्ष याप्रमाणे विविध कामांना मंजुरी मिळाली आहे. सदरील कामाला मंजुरी मिळवून दिल्याबद्दल भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांचे त्या त्या गावातील भाजपाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या वतीने आभार व्यक्त केले आहेत.

## पथविक्रेता समितीची निवडणूक सात सदस्यांची बिनविरोध निवड

लातूर/प्रतिनिधी: महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविका



संरक्षण व पथ विक्री विनियमन )नियम २०१६ अन्वये लातूर शहर महानगरपालिकेत लातूर नगर पथविक्रेता समितीची निवडणूक पार पडली.८ जागांसाठी झालेल्या या निवडणुकीत ७ जागा बिनविरोध आल्या तर अर्जच न आल्याने १ जागा रिक्त राहिली.

या निवडणुकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून डॉ. पंजाबराव खानसोळे यांची नियुक्ती करण्यात आली होती.अर्ज भरलेल्या सातही उमेदवारांचे अर्ज वैध ठरले.त्यामुळे त्यांची निवड बिनविरोध झाल्याची घोषणा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी केली. अनुसूचित जमाती या प्रवर्गातून अर्ज न आल्याने ती जागा रिक्त राहिली.

विजयी झालेल्या ७ जणांमध्ये अनुसूचित जाती महिला प्रवर्गातून श्रीमती उषा प्रकाश धावारे,इतर मागास वर्ग प्रवर्गातून मजीद लाडजी बागवान,अल्पसंख्यांक प्रवर्गातून गौसमियां बशिरखा गोलंदाज, दिव्यांग (महिला) प्रवर्गातून श्रीमती दीपमाला जयराम तुपकर, सर्वसाधारण महिला प्रवर्गातून श्रीमती वैशाली हनुमंत पडवळ व सर्वसाधारण प्रवर्गातून त्र्यंबक गुरुनाथ स्वामी आणि मनोज बाबुराव शिंदे यांची बिनविरोध निवड झाली.

सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून समाधान सूर्यवंशी यांनी काम पाहिले.विजयी उमेदवारांना निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. पंजाबराव खानसोळे यांनी प्रमाणपत्र प्रदान केले.

## राशीभविष्य ०९ ऑक्टोबर २०२४

मेष : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:दक्षिण
कौटुंबिक किंवा मालमत्ते विषयाच्या समस्या दूर होतील. पराक्रमामुळे विरोधक त्रस्त होतील. कर्ज घेण्यापासून दूर रहा. वहान चालवतांना सावधानी बाळगा.

वृषभ : शुभ रंग:पांढरा,शुभ दिशा: पूर्व
प्रत्येक क्षेत्रात आपल्याला मान सन्मान मिळेल. शांत व विवेक बुद्धीने काम केल्यास यश मिळेल. आर्थिक स्थिती चांगली राहील. व्यापार व्यवसाय चांगला चालेल.

मिथुन : शुभ रंग:काळा, शुभ दिशा: उत्तर
राजकीय कामे हातावेगळी होतील. जवळच्या व्यक्तीकडून उपयुक्त सल्ला मिळेल. धार्मिक कामात वेळ जाईल. आरोग्याची काळजी घ्या.

कर्क : शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पूर्व
प्रभावशाली व्यक्तित्वामुळे आपल्या गोष्टी लोकांपर्यंत पोहचविण्यात यशस्वी व्हाल. आर्थिक लाभ झाल्याने आनंदी रहाल. रागावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. कौटुंबिक जीवन आनंदी राहील.

सिंह : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:पूर्व
न्यायालयीन कामात यश मिळेल. व्यापारात नुकसान होण्याचे योग आहेत. घरातील वृध्द व्यक्तिंच्या आरोग्याची काळजी घ्या. अडकलेला पैसा मिळेल.

कन्या : शुभ रंग,हिरवा, शुभ दिशा:पूर्व
आपल्या कामाचे प्रतिफळ ताबडतोब मिळेल. कार्याचा विस्तार वाढून अनकूल परिस्थिती निर्माण होईल. काही महत्वपूर्ण निर्णय घ्याल. कोणाचाही राग करू नका.

तुळ : शुभ रंग:निळा, शुभ दिशा:उत्तर
वाद विवाद किंवा भांडणामुळे आपले मानसिक संतलुन बिघडेल. व्यापार मध्यम राहील. नौकरांवर अतिविश्वास दाखवू नका. खर्च कमी करण्याचा प्रयत्न करा. मुलांच्या रोजगार विषयक काळजी मिटेल.

वृश्चिक : शुभ रंग :गुलाबी, शुभ दिशा : पूर्व
व्यवसायात फायदा होईल त्यामुळे मन प्रसन्न राहील. चांगल्या बातम्या ऐकण्यास मिळतील, मान सन्मानात वाढ होईल. चातुर्याने काम केले तर आजचा दिवश शुभ आहे. विरोधकांपासून सावध रहा.

धनु : शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा:उत्तर
मनात अशांती असल्या कारणाने आपल्याला संकटाचा सामना करावा लागेल. नौकरी रोजगारात जबाबदारीनुसार काम करा. आर्थिक अडचणीमुळे मन त्रस्त राहील.

मकर : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:उत्तर
सामाजिक मान सन्मान मिळाल्याने आनंदी रहाल. चैन करण्याकडे ओढा राहील. व्यापारात नवीन संबंध फायदेशीर ठरतील. वहान चालवतांना काळजी घ्या. कौटुंबिक जीवन आनंदी राहील.

कुंभ : शुभ रंग: लाल, शुभ दिशा:दक्षिण
आपल्या बुद्धीच्या जोरावर आखलेल्या योजना यशस्वी होतील. आपल्या कामकाजात बदल होण्याची शक्यता आहे. वाहन चालवतांना सावधानी बाळगा.

मीन : शुभ रंग :पिवळा,शुभ दिशा:उत्तर
कुटुंबात मोठ्यांचे मार्गदर्शन मिळेल. कायद्यातील वादाचा निपटारा होईल. आर्थिक योग उत्तम आहेत. व्यवसायीक योजना गुप्त ठेवा.

## इतिहासात आजचा दिवस ०९ ऑक्टोबर

अंतरराष्ट्रीय
१७६० – रशियाने बर्लीनचा पराभव केला.
२००४ – अफगाणिस्तानात प्रथमच लोकशाही निवडणूक.
२००५ – इंग्लंडमध्ये रेल्वे प्रवासात धुम्रपानावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली.
२००६ – हॉलंडने माद्रिदमध्ये ऑस्ट्रेलियाला ३–१ हरवून सहाव्यांदा महिला हॉकी विश्वचषक जिंकला.

राष्ट्रीय
२००६ – टाडाच्या विशेष न्यायालयाने १९९३ मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणाचा आरोपी फारूख पावलेला दोषी घोषित केले.
२००७ – मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरने एक दिवसीय क्रिकेटमध्ये विक्रमी सातव्यांदा कॅलेंडर वर्षात एक हजार धावा बनवण्याचा पराक्रम केला, असा विक्रम करणारा जगातला तो एकमेव फलंदाज ठरला.
२००८ – भारतात तयार करण्यात आलेला जीवनपट ’स्माईल पिंकी’चा ८१ व्या ऑस्कर पुरस्कारांच्या यादीत समावेश झाला.
२००८ – ऑस्ट्रेलिया क्रिकेट संघाचा कर्णधार रिकी पाँटिंगने भारतीय भूमीत पहिले कसोटी शतक झळकावले आणि लिटिल मास्टर सुनील गावस्करच्या कसोटीतील धावसंख्येचा विक्रम मोडला. यासोबतच त्याने एक कर्णधार म्हणून कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक १६ शतक ठोकण्याचाही विक्रम आपल्या नावावर केला.

जन्म
१२६१ – दिनिस, पोर्तुगालचा राजा.
१३२८ – पीटर पहिला, सायप्रसचा राजा.
१७५७ – चार्ल्स दहावा, फ्रांसचा राजा.
१८६५ – जॉन रीडमन, ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.
१८७३ – चार्ल्स वॉल्ग्रीन, अमेरिकन उद्योगपती.
१९४६ – तान्सु सिलर, तुर्कस्तानचा पंतप्रधान.
१९५० – मिक मलोन, इंग्लिश क्रिकेट खेळाडू.
१९५१ – जॉफ कूक, इंग्लिश क्रिकेट खेळाडू.
१९५३ – टोनी शालूब, अमेरिकन अभिनेता.
१९७५ – महेन्द्र नागामूटू, वेस्ट इंडीझचा क्रिकेट खेळाडू.

निधन
१०४७ – पोप क्लेमेंट दुसरा.
१३९० – जॉन पहिला, कॅस्टिलचा राजा.
१५९७ – अशिकागा योशियाकी, जपानी शोगन.
१८९२ – गोपाळ हरी देशमुख ऊर्फ लोकहितवादी, सामाजिक सुधारणेसाठी प्रयत्नशील असणारे, शतपत्राचे लेखक.
१९१४ – विनायक कोंडदेव ओक, मराठीतील बालसाहित्यकार तसेच ‘बाळबोध’ या लहान मुलांच्या मासिकाचे संपादक.
१९३४ – अलेक्झांडर पहिला, युगोस्लाव्हियाचा राजा.
१९३४ – लुई बार्थु, फ्रांसचा पंतप्रधान.
१९५५ – गोविंदराव टेंबे, प्रसिद्ध हार्मोनियमवादक अभिनेते.
१९५८ – पोप पायस बारावा.
१९८७ – गुरू गोपीनाथ, भारतीय नर्तक.
१९९५ – अलेक डग्लस–होम, फ्रांसचा पंतप्रधान.
१९९६ – गोदावरी परुळेकर, स्वातंत्र्य चळवळीतील थोर नेते.
२००६ – कांशीराम, बसपाचे संस्थापक.
२००७ – बी. भास्कर, क्रिकेटपटू, केरळच्या रणजी संघाचे माजी कर्णधार.
२००८ – डॉ.स.रा. ऊर्फ सदाशिव रामचंद्र गाडगीळ, ज्येष्ठ समीक्षक, साहित्यिक.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी) RNI No.: - MAHMAR/2017/72894